शनिवार । ५ जुलै १९८० । ७५ पैसे

# माणूस

झोपडपट्ट्यांचे, शहरातील
गलिच्छ वस्त्यांचे

**प्रश्न**

कायमचे, मुळापासून
सोडवायाचे असतील तर
ज्या भागातून
माणसांचे हे लोंढे
दरदिनी, दरक्षणी
शहरात दाखल होत
आहेत
त्या भागांची-आपल्या
दुष्काळी खेडेगावांची
नवी उभारणी
केली पाहिजे.

अशा एका
उभारणी प्रयत्नाची
कथा सादर करणारा
एकलेखकी अंक

**माणूस**

## किसान कामगार विशेषांक

सादरकर्ते
विजय परुळकर

लवकरच
प्रसिद्धीच्या
वाटेवर....

"आज धरती बीमार है !"

# कुठल्या अर्थशास्त्राच्या मागे आपण धावणार आहोत ?

## राजकारणात नसलेल्या एका बहुगुणांचा सवाल

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने शनिवारी (दि २८ जून) संध्याकाळी तेहरी–गढवालमधील प्रसिद्ध सर्वोदयी कार्यकर्ते श्री. सुंदरलाल बहुगुणा यांचे व्याख्यान आयोजित केले होते. विषय होता 'चिपको आंदोलन और पर्वतीय विकास' हिमालयाच्या गढवाल–कुमाऊँ विभागातील पहाडी–आदिवासी लोकांनी आपले वनाधिकार व पर्यावरणाचे रक्षण यासाठी १९७३ पासून 'चिपको' नावाचे अभिनव आंदोलन सुरू केले आहे. स्थानिक लोकांनी स्वयंस्फूर्तपणे सुरू केलेल्या या आंदोलनाचे सुंदरलालजी एक प्रमुख कार्यकर्ते आहेत. मानव–विज्ञान–परिषदेचे, श्री. जगदीश गोडबोले यांनी श्रोत्यांना सुंदरलालजींचा थोडक्यात परिचय करून दिला आणि सुंदरलालजींनी त्यानंतर दीड तास आपल्या मातृभाषेत–हिंदीत-आपले हृद्गत श्रोत्यांना ऐकविले.

'चिपको' आंदोलनाविषयी प्रथम ऐकले तेव्हापासूनच त्याविषयी उत्सुकता वाटत होती. 'चिपको' शब्दापासूनच ही उत्सुकता होती. 'चिपको' म्हणजे काय ? नंतर समजले की, हा एक स्वच्छ हिंदी शब्द असून याचा अर्थ–' पेड को चिपको '–ठेकेदारांच्या कामगारांना झाड तोडण्याला प्रतिबंध करण्यासाठी झाडाला तिघाचौघांनी मिठी मारून बसायचे. नि.शस्त्रप्रतिकाराचा हा एक अभिनव आणि अतिशय प्रभावी मार्ग आहे. या आंदोलनात स्त्रियांचा विशेष पुढाकार आहे. मुलांचीही त्यांना पुरेपूर साथ आहे. स्थानिक स्त्रियांपैकी एकीला सुंदरलालजींनी विचारले, 'ही कल्पना त्यांना सुचली कशी ?' तिने सांगितले, 'मी माझ्या मुलासह जंगलातून जाताना एखाद्या जनावराने आमच्यावर हल्ला केला तर मी काय करीन ? प्रथम मुलाला वाचविण्यासाठी त्याला छातीशी कवटाळीन ! तेच आम्ही झाडाला वाचविण्यासाठी करतो !'

'चिपको'चा हा अर्थ समजल्यावर आंदोलनाविषयी माझी उत्सुकता अधिकच वाढली. अधूनमधून काही लेख वाचनात येत होते; पण परवा अचानक सुंदरलालजींचे भाषण ऐकायला मिळाले आणि पूर्ण समाधान झाले. प्रा. रा. के मुटाटकरांनी आभाराच्या भाषणात सांगितल्याप्रमाणे, ते भाषण नव्हे तर एक चिंतनच होते. मनाला जाऊन भिडणारे अतिशय तरल असे चिंतन. निसर्ग–मानव-संबंधाचे एक खास भारतीय तत्त्वचिंतन या आंदोलनामागे आहे हे या वेळी जाणवले. हिमालयाच्या पहाडातील एका खेड्यात सुरू झालेल्या या आंदोलनाचा विकास होत होत आता एका जागतिक समस्येपर्यंत या आंदोलनाचे सूत्र जाऊन भिडले आहे.

¤

भाषणात सुरुवातीला सुंदरलालजींनी स्वत:चा परिचय करून दिला. तेहरी-गढवाल या भारतातील सर्वांत गरीब जिल्ह्यात त्यांचा जन्म झाला. वयाच्या तेराव्या वर्षीच समाजकार्यासाठी ते घरातून बाहेर पडले. उदरनिर्वाहासाठी पत्रकारिता आणि प्रसंगी पेपर विकण्याचेही काम केले. 'घुमक्कडी' म्हणजे भटकंती हा छंद. त्यापायी देशभर हिंडले. जन्मभर सार्वजनिक कार्य करण्याचे वचन, ८४ दिवस उपोषण करून शेवटी तुरुंगात शहीद झालेल्या आपल्या गुरूला त्यांनी दिले होते. ते आजपर्यंत पाळले आहे. स्वराज्याच्या आंदोलनात भाग घेतला. त्यानंतर पहाडी जंगलातील आदिवासींच्या दारिद्र्याचा प्रश्न सोडवायचे आव्हान स्वीकारले. सुंदरलालजी म्हणाले –


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे
अंक : पाचवा
५ जुलै १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४५९

शहरातील शिक्षित तरुण यासाठी विद्वानाची पुस्तके वाचतात, मी एकच पुस्तक वाचले, ते म्हणजे पहिली पंचवार्षिक योजना. देशभरच्या वनवासीच्या समस्या सोडविण्यासाठी मुंबई राज्याच्या धर्तीवर जगल-कामगारांच्या सहकारी सोसायटचा स्थापन कराव्यात अशी शिफारस योजनेत केली होती तेव्हाचे मुख्यमंत्री श्री बाळासाहेब खेर यानी जंगल-कामगारावरील अत्याचार, कामगाराला ठेकेदाराने कोळशाच्या भट्टीत ढकलून जिवंत जाळण्यासारखे प्रकार प्रत्यक्ष पाहिले होते त्यामुळे त्यांनी पुढाकार घेऊन राज्यात जंगल-कामगार सोसायटचा स्थापन केल्या व ठेकेदारीच्या जुलुमातून कामगाराना सोडविले. योजनेतील या अहवालाने प्रभावित होऊन मी १९५४ मध्ये मुंबईला आलो. महाराष्ट्र-गुजरातमध्ये हिंडून अभ्यास केला. पती-पत्नी दोघानीही एका खेड्यात स्थायिक होऊन आश्रमशाळा आणि जंगल कामगार सोसायटी चालवायची हा येथील विधायक कार्यकर्त्यांचा मार्ग आपणही अनुसरावा असे सुंदरलालजीनी ठरविले व त्यानुसार काम सुरू केले. बापूजीनी 'एका खेड्यासाठी एक सेवक' अशी मागणी केली होती, ती सुंदरलालजीनो आपल्या परीने पूर्ण केली; परंतु १९६० साली विनोबांनी सागितले, 'तुमच्यासारख्या जवान माणसानी आश्रमात राहून उपयोगाचे नाही. हिमालयात उत्तरेकडून चीनचे वैचारिक आक्रमण होण्याचा धोका आहे म्हणून गावोगाव हिंडून बापूजीचा आदेश पोचवा!' सुंदरलालजी म्हणाले, मला आवडीचेच काम मिळाले; परंतु हिमालयात गावोगाव हिंडताना चीनपेक्षा वेगळाच धोका मला जाणवला. तो म्हणजे पुराच्या आक्रमणाचा. हे नवे संकट लोकांनी ओळखावे म्हणून लेख लिहिले. धरणे बाधून पुराचा धोका टळणार नाही. त्याचा उगम डोंगरमाथ्यावर आहे. जंगले नष्ट झाल्याने तिथे पडणारे पाणी-दगड माती घेऊन वेगाने खाली येते (लॅन्ड स्लाइड्स्), नद्याच्या प्रवाहात अडथळे निर्माण होतात, त्यामुळे पुरांचे संकट वाढते आहे

### अज्ञात प्रेरणा

'चिपको' आंदोलनाविषयी बोलताना सुंदरलालजी म्हणाले, तसे पाहिले तर हे आंदोलन ३५० वर्षांपूर्वीच सुरू झाले आहे. त्या काळी एका गावातील राजाने झाडे तोडण्याचा हुकूम दिला; परंतु लोकानी त्याला प्रखर विरोध केला. राजाचे शिपाई झाडे तोडण्यास आले तेव्हा अंबिकादेवी नावाच्या एका स्त्रीने झाडाला मिठी मारली. शिपायांनी तिच्यावर कुऱ्हाडीचे घाव घातले. अशा पद्धतीने ३६३ माणसानी बलिदान केले, तेव्हा राजाने आपला हुकूम मागे घेतला. बिष्णोई जमातीचे हे लोक आजही वनांचे, वनातील पशु-पक्ष्यांचे रक्षण करतात. त्यांच्या बलिदानातूनच आजच्या आंदोलनाला अज्ञात प्रेरणा मिळाली असे आम्हाला वाटते.

निसर्ग व मनुष्याचे संबंध मैत्रीपूर्ण असावेत अशी भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. आदिवासी या शिकवणुकीचे पालन करीत असतात. वनाचे मित्र व्हा, नम्र होऊन त्यांच्याकडे जा, वने तुम्हाला अन्न आणि चारा देतील! ही आहे वनवासीची धारणा. जंगल हे केवळ माणसासाठीच नाही, जंगलात राहणाऱ्या पशुपक्ष्यांचा, अन्य जीवांचाही जंगलावर अधिकार आहे. झाडे, पशुपक्षी आणि माणसे या सर्वांचे मिळून जंगल बनते, परंतु जेव्हा दुसऱ्या संस्कृतीचे आक्रमण आपल्या देशावर झाले तेव्हा ही दृष्टी बदलली. भारतीय माणूस मित्र होऊन जंगलाकडे गेला तर, पश्चिमी माणूस कुऱ्हाड घेऊन गेला! पृथ्वीवर जे आहे ते माझ्या उपभोगासाठी आहे, मी निसर्गाचा स्वामी आहे ही त्याची धारणा. इंग्रजी बादशहाच्या शिकारीचे राखीव ठिकाण असाच फॉरेस्ट या शब्दाचा मूळ अर्थ आहे. औद्योगिक क्रांतीनंतर कच्चा माल मिळविण्याचे साधन म्हणून पश्चिमी माणूस जंगलांकडे पाहू लागला.

ईस्ट इंडिया कंपनीला प्रथम लोहमार्गांसाठी मोठ्या प्रमाणावर लाकडाची व त्यासाठी जंगलतोडीची आवश्यकता भासली. परंतु त्याच वेळी पुढील गरजेसाठी त्यांनी 'रिझर्व्ड् फॉरेस्टस्' ही निर्माण केली व त्यासाठी जगले सरकारने ताब्यात घेतली. व्यापारासाठी सरकारने जंगले ताब्यात घेतली आहेत त्यामुळे आपल्या उपजीविकेच्या साधनावरच गदा आली आहे अशी वनवासीची भावना होऊन १८५० ते १९०० या काळात देशात सर्वत्र अनेक आंदोलने झाली. बीरशा मुंडा या आदिवासी नेत्याने रांची येथे घडवून आणलेले आंदोलन हे त्यापैकीच एक होते. तसेच विसाव्या शतकाच्या सुरुवातीस रानीखेत भागात एक मोठे आंदोलन झाले याचा परिणाम होऊन १९०७ मध्ये, ब्रिटिश सरकारला जाहीर करावे लागले की सरकारने व्यापाराठी जंगले ताब्यात घेतली नसून नद्यांच्या संरक्षणासाठी घेतली आहेत. परंतु व्यापारी फायद्यासाठी जंगलाचा उपयोग करून घेण्याचे सरकारचे धोरण बदलेले नव्हते. इमारती लाकूड मिळविण्यासाठी सरकारने येथील मूळ जंगले तोडून हिमालयात मोठ्या पानाच्या वृक्षाऐवजी सूचिपर्णी वृक्ष, मध्यभारतात साल वृक्षाऐवजी टीक वृक्ष तर दक्षिणेत युकॅलिप्टस वृक्षांची लागवड केली. यामुळे परंपरागत मिश्र स्वरूपाच्या जगलापासून मिळणारे नैसर्गिक व व्यावहारिक फायदे नष्ट झाले व वनवासी लोकाना याची झळ प्रथम पोचली. त्यामुळे उत्तराखडामध्ये स्वराज्याचे आंदोलन पोचले ते वनआंदोलनाच्या रूपाने. सरकारने जंगलामध्ये हस्तक्षेप करू नये यासाठी गोविंदवल्लभ पंत यांनी १९३० मध्ये मोठे जंगल आंदोलन घडवून आणले, परंतु शस्त्रबलाने त्याचा बीमोड करण्यात आला.

स्वातंत्र्यानंतरही व्यापारी फायद्यासाठी जंगलतोड चालूच राहिली. त्याविरुद्ध चामोली (उ.प्र.) जिल्ह्यातील मंडळ या गावी जे पहिले आंदोलन झाले तीच 'चिपको' आंदोलनाची सुरुवात होय. या भागातील अंगु (अॅश ट्री) या वृक्षापासून आदिवासी 'जू' बनवीत असत. त्यासाठी झाडे तोडण्यास त्यांनी सरकारकडे परवानगी मागितली तेव्हा त्याना नकार मिळाला. मात्र त्यानंतर लगेचच अलाहाबादच्या खेळाचे सामान बनविणाऱ्या एका कंपनीला सरकारने लिलावाने ही झाडे विकली व ती तोडण्यास अनुमती दिली. ह्या प्रकाराविरुद्ध लोकांचा असंतोष उफाळून आला. झाडे तोडायला जेव्हा ठेकेदार येतील तेव्हा झाडाना कवटाळून बसायचे आणि झाडे तोडू द्यायची नाहीत, असे त्यानी ठरविले. लोकांच्या या अभिनव प्रतिकारामुळे कंपनीचा नाइलाज होऊन त्यानी केदारनाथच्या परिसरातील मंदाकिनी खोऱ्यातील झाडे तोडण्याची परवानगी मिळविली. परंतु तिथेही लोकानी त्याचा पाठलाग करून झाडे तोडू दिली नाहीत.

## रक्षाबंधन

अलकनंदेच्या महापुराने व लॅण्डस्लाइडस्‌मुळेही या भागातील लोकाचे खूप नुकसान झाले होते. या नैसर्गिक वाटणाऱ्या आपत्तीला व्यापारी हेतूने होणारी जंगलतोडच कारणीभूत आहे हे लोकांनी ओळखले. त्यामुळे शास्त्रीय जंगलतोडीच्या नावाखाली अलकनंदेच्या वरच्या भागातील एका खेड्यानजिकच्या जंगलाचा लिलाव होऊन ठेकेदार झाडे तोडण्यास येणार असल्याचे समजले तेव्हा लोकानी त्यास विरोध करण्याचे ठरविले. लोकाची समजूत घालण्यासाठी सरकरी अधिकारी आले व पुरुषांना आपले म्हणणे पटविण्यात, लालूच दाखविण्यात ते यशस्वी झाले. परंतु स्त्रियाचा या गोष्टीला प्रखर विरोध होता. तसेच घूमसिंग नेगी या कार्यकर्त्याचाही कोणत्याही कारणासाठी जंगलतोडीस विरोध असल्याने ते एका झाडाखाली उपोषणास बसले. पाच-सहा दिवस झाल्यावर स्त्रियांना आपल्या या एकमेव पाठिराख्याच्या जीविताबद्दल काळजी वाटू लागली. शेवटी एका अटीवर घूमसिंगानी उपोषण सोडण्याचे मान्य केले. तोडण्यासाठी खुणा केलेल्या सर्व झाडांना राख्या बाधा म्हणजे तुम्ही त्यांचे प्राणपणाने रक्षण कराल असा विश्वास मला वाटेल असे घूमसिंगानी स्त्रियाना सागितले आणि स्त्रियानी खरोखरच झाडाचे रक्षाबंधन केले. अर्थातच हे लोकही मंडलच्या 'चिपको' आदोलनाच्या लोकांना येऊन मिळाले या लोकाना जंगलविज्ञान शिकविण्यासाठी जेव्हा सरकारी अधिकारी आले तेव्हा बायकांनी भर दिवसा पेटत्या कंदिलांनी त्याचे स्वागत केले सभेत अधिकाऱ्यांचे भाषण झाल्यावर स्त्रियांनी सागितले, आम्हाला एवढेच समजते की, 'झाडे तोडली की माती वाहून जाते व मातीपाठोपाठ आमचे मर्दही गाव सोडून नोकरीसाठी दिल्लीला जातात. माती वाहून गेल्याने शेतीभाती, बागा तर नष्ट होतातच; पण जंगलातून आम्हाला लाकूडफाटा आणि चारा मिळणेही मुष्किल होऊन जाते. या प्रश्नाला तुमच्याकडे काय उत्तर आहे?' अधिकाऱ्याजवळ उत्तर नव्हते. लोक बगावत करतात, विज्ञानाला आव्हान देतात असा रिपोर्ट देऊन लोकाचा विरोध मोडून काढण्यासाठी सशस्त्र पोलीस देण्याची मागणी मात्र त्यांनी केली.

बायकानी सरकारी घोषणा बदलली. 'क्या है जगलके उपकार? लीसा, लकडी और व्यापार।' याऐवजी 'क्या है जंगलके उपकार? मिट्टी, पानी और बयार (हवा), जिंदा रहनेके आधार।' अशी नवीन घोषणा त्यांनी तयार केली. 'चिपको' आंदोलनाचे अर्थशास्त्रही बायकांनीच दिले. अप्रत्यक्षरीत्या त्यानी माडलेला प्रश्न रास्त होता तुम्ही कुठल्या अर्थशास्त्राच्या मागे लागणार? चैनीच्या वस्तू बनविणाऱ्या कारखान्याचे अर्थशास्त्र? की लोकांच्या जीवनविषयक गरजा, ज्या नैसर्गिक जंगलाकडून पूर्ण केल्या जातात, ते अर्थशास्त्र? जंगलतोडीला विरोध चालूच राहिला. लोकांच्या पाच मागण्या होत्या. व्यापारी फायद्यासाठी होणारी जंगलतोड थाबवा. ठेकेदारी बंद करून जंगल कामगार सोसायटचा स्थापन करा. जंगल कामगारांना किमान वेतनाची हमी द्या. वनाच्या प्रदेशात प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयापर्यंत शिक्षणात वनस्पतिविज्ञानाचा, जंगलविज्ञानाचा समावेश करा आणि पुढील दहा वर्षे कोणत्याही कारणास्तव जंगलतोड बंद करा! परतु सरकारने या मागण्या मानल्या नाहीत. लिलाव करणे चालूच ठेवले. लिलाव रोखण्यासाठी सुंदरलालजीनी पंधरा दिवसाचे उपोषण केले. शंभर वर्षांपूर्वी ब्रिटिश सरकारने 'जंगलाचे शास्त्रीय व्यवस्थापन' म्हणून जे ठरविले होते, ते वसाहतवादी दृष्टिकोनातून होते, 'वैज्ञानिक कटान' ही कितपत योग्य आहे याबद्दलही लोकाच्या मनात संशय होता म्हणून याचा पुनर्विचार करण्यासाठी एक निपक्ष समिती नेमावी अशी सुदरलालजीनी मागणी केली. त्याप्रमाणे समिती नेमण्यात आली; परंतु ती प्रत्यक्षात काम करू शकली नाही. या अनुभवाने सुदरलालजीनी लखनौ-दिल्लीला जाणे-येणे बद केले व गावोगाव हिंडून या प्रश्नावर लोकजागृती व्हावी यासाठी लोकशिक्षण देण्यावर आपले लक्ष केंद्रित केले.

सुदरलालजी म्हणाले की, पुण्यातील तज्ज्ञांना आश्चर्य वाटेल; पण श्रीमद् भागवताच्या पोथींमधून अतिशय प्रभावीरीत्या या प्रश्नावर आम्ही लोकशिक्षण दिले, डॉ. इंदुताई टिकेकर यानी प्रथम शराबबंदी आंदोलनात याचा यशस्वी उपयोग केला. भागवताचा नवा अर्थ त्यानी लोकांना सांगितला. मानव आणि आत्मा, मानव आणि समाज, मानव आणि निसर्ग (प्रकृती) याच्यातील संबंध त्यानी लोकांना स्पष्ट करून सागितले. भागवतकथेप्रमाणेच श्री. घनःश्याम छैलानी यांच्या लोकगीताचाही या आंदोलनाच्या यशात फार मोठा वाटा आहे. या माध्यमाद्वारा लोकांना आम्ही लालूच आणि भीती यापासून मुक्त केले त्यामुळेच आदोलन भक्कम पायावर उभे राहिले. ठेकेदाराच्या कुऱ्हाडींना परतवून लावण्याचा निर्भयपणा जसा लोकांमध्ये ठिकठिकाणी दिसतो, तसाच सरकारच्या कुठल्याही प्रलोभनाना बळी न पडण्याचा लोकांचा निर्धारही पक्का असल्याचे दिसून येते. ज्या गावांमध्ये आंदोलकांचा विशेष जोर आहे त्या त्या गावाजवळ शटल बनविण्याचे लहान लहान कारखाने सुरू करण्याचे व त्यात स्थानिक लोकाना रोजगार देण्याचे सरकारने जाहीर केले; परंतु बायकांनी ठणकावून सागितले, चार-दोन लोकाना नोकरी देणारे तुमचे कारखाने आम्हाला नकोत! त्यापेक्षा म्हशी पाळण्याचा आमचा उद्योगच अधिक चागला आहे. सरकारने धमकी दिली, 'तुरुंगात घालू!' त्याला लोकाची तयारी होतीच. सरकारने सागितले, 'तुम्हाला फॅक्टऱ्या नकोत तर फॅक्टरीतून तयार होणारी माचिसही तुम्हाला मिळणार नाही अशी व्यवस्था करू!' बायकानी सागितले आम्ही दगडाने ठिणगी पाडून चूल पेटवू; पण काय वाटेल ते झाले तरी यापुढे जंगलातून कच्चा माल नेऊ देणार नाही! असे होते हे आदोलचाचे स्पिरिट! 'चिपको' आंदोलनाने १९६९ पासून वनवासीच्या न्याय्य हक्कांसाठी चालू असलेल्या आंदोलनाला फार मोठी चेतना दिली.

## मुख्य मागण्या

चिपको आदोलनाच्या आता तीन मुख्य मागण्या आहेत.

(१) भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि शेतीला पाणी आणि माती पुरविणे हा हिमालयातील पर्वतीय वनांचा प्रमुख उपयोग आहे हे सरकारने मान्य करावे व देशातील सर्व नैसर्गिक पर्वतीय वने ही 'प्रोटेक्शन-फॉरेस्टस्' आहेत असे जाहीर करून त्याच दृष्टिकोनातून त्यांचे

पृष्ठ २३ वर

# पुणे ते दिल्ली । संजय निधनानंतर

सतीश कामत

## जून महिना इंदिराजींना लाभत नाही हेच खरे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल जूनमध्ये लागला. आणीबाणी जूनमध्येच लागू करण्यात आली. संजयला विमान उडवायचं लायसेन्स जूनमध्येच मिळालं आणि त्याचा मृत्यूही जूनमध्येच ओढवला !

२३ जूनची सकाळ पुण्यात पावसाने संततधार धरली होती. महाराष्ट्राचं नवं मंत्रिमंडळ सत्तेवर आलं होतं. परंपरागत नेतृत्व मोडून महाराष्ट्रात नवं नेतृत्व रुजवण्याचा हा एक प्रयत्न; पण या नव्या नेतृत्वाला समाजामध्ये काही पाया–मुळं आहेत का याविषयी मनात कुतूहल होतं. म्हणून दुपारी बाराच्या एस. टी. ने सांगलीला जायचा विचार करत होतो. सांगली पुन्हा एकदा डिवचल्या गेलेल्या वसंतदादाची आणि हो, सौ शालिनीबाई पाटील यांचीही! अकराच्या सुमारास सहज रेडिओ लावला आणि खास बातमीपत्रात श्री. संजय गांधी यांच्या निधनाची बातमी ऐकली. त्या दिवशी दिल्लीपतीविषयीच काही विचार मनात घोळत होते. तोच ही बातमी. बरीचशी धक्का दायक; अनपेक्षित त्यामुळेच चटकन विश्वास बसू नये अशी; पण पाठोपाठच केंद्रीय माहिती व नभोवाणी मंत्र्याचा शोकसंदेशही ऐकवण्यात आला 'आज सकाळीच सूर्यास्त झाल्यासारखा वाटला!' वगैरे वगैरे. सगळा संदर्भच गर्रकन फिरला. बरोब्बर वर्षानंतर पुन्हा एकदा दिल्लीच्या राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली होती. आता सांगलीकरांची नस चाचपण्यात फारसं स्वारस्य उरलं नव्हत. दुपारी रेल्वेस्टेशनवर गेलो आणि चार–पंचावन्नच्या पुणे–जम्मुतावी झेलम एक्सप्रेसमध्ये बसलो.

संजय नेहमीप्रमाणे सकाळी विमान उडवत असताना अपघात झाला, एवढंच अकराच्या बातम्यांमध्ये सांगितलं होतं; पण तेवढ्यावरूनही अनेक प्रसंगाची–वाचलेल्या, ऐकलेल्या, पाहिलेल्या मनात गर्दी जमा झाली मारुती-मोटार, आणीबाणी, तुर्कमानगेट, कुटुंबनियोजन. आणीबाणीच्याच काळात –१९७६ साली युवराज पुण्याला आले होते. शंकरराव चव्हाण तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. शनिवारवाड्यावर सकाळी दहा-साडेदहा वाजता सभा झाली. 'संजयजींनी आम्हाला मार्गदर्शन करावं' अशी शंकररावांनी विनंती केली. संजयजी उभे राहिले. स्वतःच्या पाच कलमी कार्यक्रमातल्या प्रत्येक कलमावार दोन–चार वाक्ये बोलले व 'बाते कम, काम जादा' या स्वतःच्याच घोषणेचा किमान पूर्वार्ध तरी अंमलात आणावा म्हणून असेल, दहा–एक मिनिटातच खाली बसले! बरोबर सौ. मनेकाबाईही होत्या. उघड्या जीपमधून आले आणि तसेच परत गेले!

'झेलम'च्या बोगी–बोगीमध्ये आज अशीच काही तरी चर्चा चालू होती. कोणी सजयच्या करारीपणाचे कौतुक करत होते, कोणी आडमुठेपणाचे, तर कोणी एवढा आघात होऊनही इंदिराजींनी कॅप्टन सुभाष सक्सेनाच्या आईचं सांत्वन केलं म्हणून त्यांच्या धैर्याची, संयमितपणाची स्तुती करत होते. अपघात नेमका का झाला व कसा झाला याबद्दल फारसे कुणालाच माहिती नव्हते. कारण त्या दिवशी दुपारी जो तो गाडीत जागा मिळवण्याच्याच विवंचनेत होता; पण त्यामुळे प्रवाशाच्या तर्क–वितर्कांना व कल्पनाशक्तीला मात्र भरपूर वाव मिळाला. हडपसरच्या ग्लायडिंग सेंटरमध्ये तीन महिने सराव केल्याच्या पुण्याईवर एक प्रवासी अपघाताच्या सर्व शक्यता समजावून देत होता. मात्र बहुतेकांना सजयच्या निधनाच्या दुःखापेक्षा इंदिराजी हा आघात कसा सहन करू शकतील याचीच चिंता होती! एकाने इंदिराजींनी मोरारजीभाईंना सन्मानाने परत बोलावून त्यांच्या हाती सर्व सूत्रे द्यावीत असे सुचवले, तर कोणी वाजपेयीप्रेमी सध्याच्या परिस्थितीत अटलजीच पंतप्रधान व्हायला कसे लायक आहेत हे पटवून देऊ लागल. बाईंनी आता संजयची पत्नी मनेका हिलाच हाताशी धरावं असंही सुचवणारे एक महाभाग निघाले! त्यांच्या मते 'सूर्य' मासिकाची संपादिका एवढं कर्तृत्व तिला राजकारणात उतरायला पुरेसे होतं. अमेठी मतदारसंघातही जागा रिकामी झाली होती आणि काँग्रेस आयचं सरचिटणीसपदही उघडं पडलं होतं. कसं का असेना, लांबच्या प्रवासाला पुरा पडेल असा विषय चघळायला मिळाला यावरही काहीजण खूष असल्यासारखे दिसत होते.

२४ जूनला सकाळी सातच्या सुमाराला इटारसी आलं, पाऊस पडतच होता. दहा मिनिटांचा हॉल्ट होता धावतच पेपरस्टॉल गाठला भोपाळ. ग्वाल्हेर, उज्जैन आणि झाशी या चार ठिकाणाहून एकाच वेळी प्रसिद्ध होणाऱ्या 'दैनिक भास्कर' या हिंदी वर्तमान पत्राचा अंक पैदा केला. 'भारतीय राजनीतीका एक उभरता सितारा अस्त!' जोरदार आठ कॉलमी मथळा ठोकून दिला होता. डाव्या बाजूला संजय गांधीचा शाल लपेटून वेगानं चालत असलेला आठ–नऊ इंची उभा दुकॉलमी फोटो. तसाच उजव्या कोपऱ्यात इंदिराजींचा; पण फक्त छातीपर्यंतचाच. चेहरा अतिशय उद्विग्न, संत्रस्त; संजयच्या फोटोखाली शकील, बदायुनीचं एक वाक्य लिहिलेलं होतं–'मैं तो इस दुनियाको क्या से क्या

बना देता, मगर किसकी चलती है हयाते मुख्तसर के सामने।' इंदिराजीच्या फोटो-शेजारी 'माँ धैर्य-साहस की प्रतिमूर्ती' हे ठळक टायपातले शब्द व त्याखाली धैर्याचं पोटभर वर्णन करणारा मजकूर. बातमीची सुरुवातही साहित्यपूर्ण होती—

'भारतीय राजनीतिके गगनपर हालही में चमका सितारा संजय गांधी अपने प्रकाश से देशको प्रकाशित करने के पूर्वही बेरहम प्रकृतिने अस्त कर दिया। देशकी असजिम तरुणाई के प्रतीक संजय गांधीने देशके भटके हुए युवकोको एक रचनात्मक दिशा देनेके जो सपने संजोये थे, शायद बेरहम प्रकृति उन्हें सहन नही कर पायी। इस आधुनिक अभिमन्यूने भारी झंझावातो और तूफानोका सामना करते हुए उनके मूंह मोड दिये थे। अपनी दास्तां सुनाने के पहले ही वे वायुयान दुर्घटना में चिरलीन हो गये। श्री. संजय गाधी के मन-मस्तिक में सबसे बडी साध देशके सर्वहारावर्गको ऊपर उठाने की थी। हाल ही में वे एक पुत्र के पिता बने थे। श्री. सजय गांधी जिस गति से राजनीतिमें आगे बढ रहे थे, उससे स्पष्ट प्रतीत हो रहा था कि वे देशकी बागडोर सम्हालने में अपनी माँ श्रीमती गाधीका उत्तराधिकार सम्हालेंगे। राममनोहर लोहिया अस्पताल से उनके पार्थिव शरीर को श्रीमती गाधी के निवासस्थान पर ले जाया गया है। कमरे को शीतल रखने के लिये बर्फ का प्रबंध किया गया है। कल सायं पाँच बजे उनकी अंत्येष्टि की जायेगी। हजारो नर-नारी उनके अतिम दर्शनोके लिये पहुँच रहे हैं। या साहित्यपूर्ण लेखणीने मुख्य बातमीचा पार चेंदामेंदा करून टाकला होता. संपूर्ण अंकच संजय गांधीना वाहिला होता. काही खऱ्या, काही प्रतिभेने निर्माण केलेल्या गोष्टीही तोंडी लावायला होत्याच. डब्यामध्ये अक सर्वत्र फिरला व एकदम संध्याकाळी पानन् पान सुटं होऊन परत मिळाला!

दुपारी एक-दीडच्या सुमारास ग्वाल्हेर आलं. एक प्रवासी आत चढला तो माजी राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या निधनाची बातमी घेऊनच! त्या दिवशी कशी कोणास ठाऊक, पण चित्रपटअभिनेता राजकपूर यांचंही निधन झाल्याची अफवा उठली होती. हा आत आलेला प्रवासी संजयचा कट्टवा विरोधक होता 'चलो, अच्छा हुआ...! इथूनच त्याने चर्चेला सुरुवात केली आणि मग ये पोलीटिशिअन्स् हैं या कॅपिटालिस्टस् जो दिल बहलानेके लिये हवाई जहाज उडाते है? गरिबोकी बारे में खाली लंबी चौडी बाते करते है। ये उभरता हुआ नेतृत्व सुबह उठकर क्या करता है तो बोले प्लेन उडाने जाता है। वगैरे वगैरे. उजव्या हातात धरलेल्या विडीचे झुरके घेत त्याने असा की सूर लावला होता की डब्यात सर्वजण त्याचं बोलणं फक्त थाबण्याची वाट पहात होते.

संध्याकाळचे साडेसहा वाजायला आले. दिल्ली आल्याची चिन्हं स्पष्टपणे दिसू लागली. काही जुन्या इमारती, जुन्या बांधकामाचे काही अवशेष, काही ठिकाणी अप्रतिम कोरीव काम तर अनेक ठिकाणी स्कायस्क्रॅपर्स व भव्य रस्तेही. 'तिलकब्रिज' वर गाडी असतानाच उजव्या हाताला एक हेलिकॉप्टर आकाशात घिरटया घालताना दिसायला लागलं. बऱ्याच जणाना असं वाटलं की सजयच्या महायात्रेवर आकाशातून पुष्पवृष्टी होत असावी; पण नंतर असं कळलं की दिल्ली ट्राफिकचे पोलिस उपायुक्त हवाईदलाच्या या हेलीकॉप्टरमधून महायात्रा चालली असताना वाहतुकीचं नियंत्रण करत होते.

त्या दिवशी गाडीला एक सेकंदभरही लेट झाला नाही. प्लॅटफॉर्मच्या बाहेर पडलो आणि दिल्लीची भव्यता व बकालपणाही जाणवायला लागला. शहरात त्या दिवशी चर्चेचा दुसरा विषयच नव्हता. शहरातील नव्वद-पंचाण्णव टक्के दुकाने पूर्णपणे बंद होती. त्यामुळे सर्वत्र कर्फ्यू किंवा ब्लॅकआउट असल्यासारखे वाटत होते. कोपऱ्या कोपऱ्यावर कुल्फी आइस्क्रीमवाले, पाणी पुरी, छोले-भटोरेवाले, पान-बिडी-तबाखूवाले मात्र जोरात धंदा करत होते. कुठून तरी संजयच्या महायात्रेचं धावतं वर्णनही ऐकू येत होतं.

रात्री दिल्ली टी. व्ही. वर संजयची 'अंतिम यात्रा' दाखवली. राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डीपासून तर अंत्यदर्शनासाठी रांगेत उभ्या राहिलेल्या सामान्य नागरिकांच्या प्रतिक्रिया ऐकवण्यात आल्या. काही मंत्र्यांनी प्रतिक्रिया ऊर्फ शोकसंदेश चक्क वाचून काढले. संजयच्या नावानं ऊर बडवून हंबरडा फोडणाऱ्या बायकांचं एक दृश्यही 'दूरदर्शन'नं नेमकं टिपलं होतं. संजयला श्रद्धांजली वाहणाऱ्यांमध्ये अनेक बडी बडी मंडळी होती. लष्कराच्या तिन्ही प्रमुखांनी देखील आपापल्या दलाची वैशिष्टयपूर्ण पुष्पचक्रं वाहून मावळत्या राजपुत्राला कडकडीत सॅल्यूट ठोकला!

अंत्ययात्रा इंदिराजींच्या निवासस्थानातून बाहेर पडली व काही काळातच युवक कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी महायात्रेचा ताबा घेतला. ज्या ट्रकवर संजयचा पार्थिव देह ठेवला होता त्याच्यापुढे अनेक मोटारसायकलस्वार होते. त्यानंतर 'संजय गांधी अमर रहे' 'जब तक सूरज-चाँद रहेगा, संजय तेरा नाम रहेगा' अशा घोषणा देणारे व कोणताही छायाचित्रकार फोटो घेऊ लागला की त्याच्या कॅमेऱ्यासमोर जाऊन नाचणारे युवक होते. त्यानंतर संजय गांधीचा पार्थिवदेह असलेला ट्रक व त्याच्यामागे गडद हिरव्या रंगाच्या 'जोंगा' मध्ये इंदिराजी, मनेका व इतर कुटुंबीय. सूर्य जवळजवळ अस्ताला गेला असताना संजयच्या पार्थिव देहाला अग्नि देण्यात आला. त्याचा मोठा भाऊ राजीव यांचं दुर्दैव असं की स्वतःचा पिता फिरोजशहा गांधी यांच्या शवाला त्यानंच अग्नि दिला होता, पंडित जवाहरलाल नेहरूंच्या पार्थिव देहावरही त्यानंच अंत्यसंकार केले व आता आपल्या धाकटया भावावरही तेच विधी राजीवला करावे लागत होते! इंदिराजी व मनेका चिता रचलेल्या चबुतऱ्याशेजारीच बसल्या होत्या. इंदिराजींनी जाड काचेचा काळा गॉगल चढवला असल्यामुळं त्यांच्या डोळयातले भाव कळणं अवघड होतं! पण मनेका मात्र अतिशय उद्ध्वस्त दिसत होती. ती फक्त टक लावून चितेकडे पहात होती.

या दोन दिवसात इंदिराजींनी दाखवलेल्या संयमाचे व धैर्याचे कौतुकच केले पाहिजे. ज्या वेळी अपघाताचं वृत्त त्याना कळवण्यात आलं तेव्हा देशाच्या निरनिराळया भागातून आलेल्या कॉंग्रेस आयच्या नेत्याशी त्या बोलत होत्या. त्यामध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेचं सदस्यत्व मिळवण्यासाठी उत्सुक असणाऱ्या एक बाई होत्या. संजयला अपघात झाल्याचं कळल्याबरोबर बाई तडक निघाल्या! त्या ठिकाणचं दृश्य पाहून त्याना थोडी भोवळ आली; पण त्यांनी लगेच स्वत.ला सावरलं त्यानंतर बाईंनी आपलं धैर्य सोडलं

नाही. इतकंच नव्हे तर, अलाहाबाद न्यायालयप्रकरणी गाजलेले यशपाल कपूर यांनी तर सांगितलं की जनता पक्षाध्यक्ष चंद्रशेखर लोहिया हॉस्पिटलमध्ये आल्यानंतर बाई त्यांना म्हणाल्या की, 'मला तुमच्याशी आसाम प्रश्नाबाबत चर्चा करायची आहे' तेव्हा चंद्रशेखर त्याना म्हणाले–' नॉट टूडे मॅडम !' लोहिया रुग्णालयातून संजयचे शव ताब्यात मिळण्यास चार-पाच तास लागले. या काळात बाई अत्यंत अस्वस्थ होत्या. दर अर्ध्या तासाने त्या 'अजून किती वेळ लागणार आहे ?' म्हणून चौकशी करत. शेवटी तर एकदा त्या त्रागाने ओरडल्या-' अजून किती वेळ लागणार आहे मला कोणीच सांगू शकणार नाही का ?' २४ तारखेला पहाटे राजीव आला नि बाईंचा बांध पुन्हा एकदा फुटला! एअर इंडियाची न्यूयॉर्क दिल्ली फ्लाइट मुद्दाम वळवून रोममार्गे आणण्यात आली व राजीव आणि त्याच्या कुटुंबियांची विमानात व्यवस्था करण्यात आली.

२५ तारखेला शांतिवनात गेलो. पं. नेहरूंची समाधी तिथे आहे. अत्यंत रमणीय स्थळ. उत्कृष्ट वृक्षराजी. व्यवस्थित कापलेली हिरवळ, फुलझाडं, मागल्या बाजूला पाण्याचा कृत्रिम पण सुदर प्रवाह. त्यामध्ये पाऊणशे-शंभर बदकांचा क्वॅक क्वॅक करत जलविहार संजयच्या अंत्यविधीसाठी बाईंनी स्वत. जाऊन जी जागा निवडली होती, ती बरोबर पंडितजीच्या समाधीच्या मागे सुमारे शंभर-सव्वाशे फुटांवर होती; पण नतर राजीव गाधी व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यानी जाऊन जागेची पाहणी केली व ती पंडितजीच्या समाधीच्या फारच जवळ येत असल्यामुळे दुसरी जागा निवडली. पंडितजीच्या समाधी-समोर उभं राहिलं असता ही जागा उजव्या हाताला सुमारे साडेतीनशे-चारशे फुटावर येते. बुधवारी त्या ठिकाणी गेलो तेव्हा चिता पूर्णपणे जळली होती; पण काही ठिकाणांहून अजूनही धूर बाहेर पडत होता. चौथऱ्याच्या चारी बाजूना ठेवलेली पुष्पचक्रं आता वाळून गेली होती. श्री. हरीराम आजाद हे वृद्ध स्वातंत्र्यसैनिक चौथऱ्याजवळ उभे राहून चितेच्या दर्शनाला येणाऱ्यांना पुढे सरकायला सांगत होते तेवढ्यात काही फुलवाल्यानी बाहेर दुकानही थाटली होती. तिथून फुलं विकत घेऊन काही जण ती चितेवर वाहात होते. शेजारीच स्वामी रामानुजन नावाचे दाढी मिशा, जटा वाढवलेले गृहस्थ बसले होते. श्री. आजाद यानी माझी त्याच्याशी ओळख करून दिल्यावर ते एकदम उद्गारले, 'आपको कही विद्याचरण शुक्लाकी कोठीपर देखा है !' मी मानेनेच नाही म्हटलं. 'हो फीर श्यामचरणजीके कोठीपर ..' शेवटी मी पुण्याहून आलो असल्याचं त्यांना सांगितलं, तेव्हाच त्यांनी स्मरणशक्तीला ताण द्यायचं थांबवलं. 'इस शरीरको स्वामी रामानुजानी कहते है।' स्वामीजी स्वत बद्दल बोलताहेत हे सुमारे मिनिटभरानंतर लक्षात आलं.

पं. नेहरूंच्या समाधीवर गुलाबाच्या लालभडक फुलाचा हार पडलेला होता. आता तो सुकूनही गेला होता. शांतिवनातून बाहेर पडत असताना एक विचार सहज डोक्यात आला–काय योगायोग आहे पहा. पाटण्याला गेल्यावर जयप्रकाशजीच्या निवासस्थानाचं दर्शन घेणारा संजय गेल्या महिन्यात स्वत च्या आजोबांच्या पुण्य-तिथीच्या दिवशी त्याच्या समाधीवर फुलं वाहण्यास आला नव्हता आणि आता त्याच्यापासून जेमतेम चारशे फुटावरच चिरविश्रांती घेत पहुडला होता.

शांतिवनापासून राजघाट एक किलोमीटर अंतरावर आहे. इथे गांधीजीची समाधी आहे समाधीजवळ एक मोठी ज्योत सतत तेवत ठेवलेली असते. तसेच समाधीच्या चारी बाजूना भिंतीवर गाधीजीची वचनं व गांधीजीविषयी इतरांनी व्यक्त केलेली मतं दगडामध्ये कोरून ठेवलेली आहेत. इथं आल्यावर पहिली आठवण झाली ती १९७७ साली विजयी झाल्यावर जनता पक्षाच्या मोठमोठ्या नेत्यानी राजघाटावर येऊन घेतलेल्या शपथेची. या महात्म्याची त्याच्या मृत्यूनंतरही राजकीय गदारोळातुन सुटका नव्हती एवढाच त्याचा अर्थ होता.

संजय गाधीच्या निधनाबद्दल शोकसंदेश देताना श्री. वसंत साठे म्हणाले की, 'आज सकाळीच सूर्यास्त झाला...' महात्माजीच्या मृत्यूनंतर पंडित जवाहरलाल नेहरूंनी जे उद्गार काढले त्यावरूनच या दोन गांधी-मधला फरक लक्षात येईल. त्या वेळी नेहरू म्हणाले होते,

'रोशनी बुझ गई, मैंने कहा, लेकिन मैंने गलत कहा। क्योंकी जो रोशनी इस मुल्कमें चमकी वह कोई मामुली रोशनी नही थी। जिस रोशनीने इस देशको पिछले कई वर्षोमें जगमगाया वह आगे आनेवाले बहुतसे वर्षोतक वैसेही चमकती रहेगी और हजारो वर्षोंबाद भी यह रोशनी इस मुल्क में रहेगी और दुनिया इसे देखेगी और हजारो लाखो दिलोको यह ढाढस बंधाती रहेगी। यह रोशनी थी जो वर्तमानसे परे जीते जागते अमर सत्यको दर्शाती थी। उसने हमे सही रास्ता दिखाया, गलतियोसे बचाया और इस प्राचीन देशको आजादीकी राह दिखायी।'

राजघाटावरून बाहेर पडताना आणखीही एक तुलनात्मक विचार मनात आला. महात्माजींचा वध झाला, तर संजय विमान कोसळून मरण पावला. एक गाधी घातामुळं तर दुसरा अपघातामुळं जीवनाला मुकला! दोघाच्या वयात खूप अंतर होतं, विचार आणि वर्तनातही ते कायम राहिल...

## तर्कवितर्क

संजय अपघाती मृत्यूचा राजधानीत जितका बोलबाला झाला तितकाच इंदिराजींनी दाखवलेल्या साहस व संयमाचा! लष्कराच्या तिन्ही प्रमुखानी दिलेली मानवंदना, आकाशवाणी-दूरदर्शनने बजावलेली कामगिरी संजयचं कार्य कर्तृत्व यावरही उलटसुलट गरमागरम चर्चा झाली; पण या सगळ्यापेक्षाही २३ जूनला दुपारी इंदिराजींनी पुन्हा स्वत: अपघातस्थळी जाऊन किल्ल्याच्या जुडग्याची जी चौकशी केली त्याबद्दल अनेक तर्कवितर्क केले जात आहेत. संजयचा मृतदेह घरात असताना बाईंनी जातीने जाऊन त्या जुडग्याची चौकशी का करावी, संजय तो जुडगा सतत स्वत:जवळ का बाळगत असे, इतक्या महत्त्वाच्या किल्ल्या ज्या कुलुपाना लावल्या जातात त्या कुलुपाच्या आड एवढं काय दडलं असेल अशा नाना शंका सामान्य माणसं व लोकसभेतले राजकीय नेतेही व्यक्त करत होते तो जुडगा संजयचा नव्हता, तर कॅप्टन सुभाष सक्सेनाचा होता असेही काहीजण म्हणतात. काही असो, या मुद्द्यावर जोरदार वादळ उठण्याची शक्यता आहे.

दुसरा एक वादग्रस्त मुद्दा म्हणजे विमान-अपघाताच्या चौकशीचा आधी ही चौकशी खास न्यायालयातर्फे होईल असं पण नंतर सिव्हिल एव्हिएशनचे डायरेक्टर जनरलच ही चौकशी करतील असा निर्णय घेण्यात आला. या बदलामागे काय कारणं असावीत ? विमान अशास्त्रीय पद्धतीनं उडवून कॅप्टन सुभाष सक्सेनाच्या मृत्यूला कारणीभूत झाल्याबद्दल संजयवरच ठपका येण्याची शक्यता लक्षात घेऊनही निर्णय फिरवला असेल अस काही-जण म्हणतात, तर काही जणांनी या विमानाच्या सर्व व्यवहारामध्येच अनेक गैरप्रकार असल्यामुळं प्रकरण दाबण्याचा हा प्रयत्न असल्याचं सांगितलं. □

# इंदिरा कॉंग्रेस

## संजयनंतरची दिशा, समस्या

वा. दा. रानडे

संजय गांधीच्या अकाली अपघाती निधनानंतर आता त्यांची जागा कोण घेणार, तसेच इंदिरा कॉंग्रेसला काही वेगळे वळण लागेल काय हे प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्यांचे निश्चित उत्तर मिळण्यास काही अवधी जावा लागेल; पण याबाबतीत व्यक्त होणाऱ्या विचारप्रवाहावरून काही गोष्टी सूचित होत आहेत.

पहिला प्रश्न संजयच्या जागेचा. आपला राजकीय वारस आणि भावी पंतप्रधान या दृष्टीने श्रीमती इंदिरा गांधींनी संजय गांधींना तयार केले होते. इंदिरा कॉंग्रेसमध्ये त्यांचे क्रमांक दोनचे स्थान होते असे म्हटले जाते; पण वस्तुस्थिती लक्षात घेता इंदिरा गांधी व संजय याच्यात एक व दोन असे क्रम लावणेही चुकीचे होईल आणि क्रम लावायचाच झाला तर बाह्यत: अधिकाराने इंदिरा गांधी पहिल्या असतील; पण प्रत्यक्षात संजयचाच क्रम पहिला होता. सर्व महत्त्वाच्या प्रश्नावर संजयच्याच सल्ल्याने त्या वागत. संजयचा त्यांच्यावरचा प्रभाव एवढा जबरदस्त होता की, त्याचा सल्ला पटो न पटो संजयमातेला तो मानावाच लागे ! नेतृत्व करण्याची एवढी जबरदस्त आकांक्षा संजयमध्ये होती की, आपला सल्ला विचारला जाण्याची वाटही न पाहता महत्त्वाच्या प्रश्नावर तो झटपट निर्णय घेई आणि आग्रह धरून आपल्या मातेला ते मानायला लावी आणि पुत्रप्रेमापोटी इंदिरा गांधीही ते मान्य करीत. आणीबाणीचा निर्णय घेताना त्यांचा मुख्य सल्लागार संजयच होता. एकदा एखादी गोष्ट करायची ठरवली की, संजय त्याबाबतीत फार आग्रही होता. त्याला त्याच्या चुकीच्या निर्णयापासून परावृत्त करण्याची शक्ती त्याच्या मातेत सुद्धा नव्हती. धोक्याची विमानोड्डाणे करण्याविरुद्ध त्याला अनेकांनी इशारा दिला होता. इंदिरा गांधींनीही दिला असेल; पण त्याला कोणीच परावृत्त करू शकले नाही !

संजयच्या जागी नव्या वारसाचा शोध हे इंदिरा गांधीपुढे सर्वांत मोठे आव्हान आहे. पंडित नेहरूंनी आपल्या वारसाची चिंता कधी केली नाही. किंबहुना आपला वारस त्यांनी तयार केला नाही हीच त्यांच्यावर मुख्य टीका होती. परिस्थितीतून नवे नेतृत्व पुढे येईल. त्यासाठी आधी योजनापूर्वक काही करायला नको अशी त्यांची भूमिका होती आणि त्या वेळी काही कल्पनाही नसता इंदिरा गांधींच्या रूपाने प्रभावी नेतृत्व पुढे आले. इंदिरा गांधींना मात्र आपल्या वारसाचा प्रश्न परिस्थितीवर सोपवावयाचा नव्हता आणि त्यांनी तसे मनात आणले असते तरी संजयने ते मानले नसते ! नेतृत्व करण्याची जबर आकांक्षा त्याच्या व्यक्तिमत्त्वात होती. त्याने स्वत:च पुढाकार घेऊन नेतृत्व मिळविले असते.

इंदिरा गांधी आणि संजय यांच्यात संघर्ष निर्माण झाला असता का ? संजयच्या काही गोष्टी पसंत नसल्या तरी त्याचा प्रभाव इंदिरा गांधी दूर सारू शकत नाहीत हे दिसून आले होते. त्यामुळे इंदिरा गांधींनी संघर्ष येऊ दिला नसता असे वाटते; पण आता संजय गांधी काळाच्या पडद्याआड गेल्याने तो प्रश्नच राहिलेला नाही. तेव्हा संजयचा प्रभाव दूर झाल्याने इंदिरा गांधी आता स्वत:च्या मतानुसार धोरणे व कार्यक्रम आखतील काय ? पक्षात तरी त्या म्हणतील तो शब्द अशी परिस्थिती आहे. विरोधी पक्ष अत्यंत दुबळे आहेत. तेव्हा एक दशवार्षिक योजना आखून तिचा पहिला अर्धा भाग १९८५ पर्यंत त्यांनी अमलात आणावा. केवळ सत्ता हाती असून असा कार्यक्रम अमलात आणता येत नाही. नोकरशाहीवर विसंबून असे कार्यक्रम यशस्वीपणे राबविले जात नाहीत. त्यासाठी लागते निश्चित विचारप्रणालीने भारलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची शिस्तबद्ध संघटना. हिकमती डावपेच लढविण्यात इंदिरा गांधी नेहरूंपेक्षा सरस असतील; पण शिस्तबद्ध संघटना उभारण्यासाठी आवश्यक असलेले नेतृत्वगुण नेहरूंमध्ये नव्हते आणि त्यांच्या कन्येमध्येही नाहीत ! दुसरे असे की, ठाम विचारप्रणाली, कार्यक्रम त्यांच्यापाशी आहेत का ? तुम्हाला पटो, न पटो नेहरूंजवळ विशिष्ट विचारप्रणाली होती व तिच्यावर त्यांचा विश्वास होता. इंदिरा गांधींच्या राजकारणात विचारप्रणालीला दुय्यम स्थान असून सत्ता मिळविणे व टिकविणे आणि त्यासाठी सतत डावपेच लढविणे हेच त्यांचे मुख्य राजकारण झालेले आहे. त्यामुळे निश्चित कार्यक्रमाची निष्ठापूर्वक अंमलबजावणी कितपत होईल याची शका वाटते. १९७७ पूर्वीची अकरा वर्षे त्यांनी ज्या पद्धतीने कारभार केला त्यापेक्षा फारसे काही निराळे घडेल असे वाटत नाही.

संजयच्या जागी नव्या वारसाचा शोध सोपा नाही युवक कॉंग्रेसच्या काही शाखांनी राजीव गांधी व श्रीमती मेनका गांधी यांची नावे सुचविली आहेत. त्या दोघांपैकी एक अमेठीहून लोकसभेत निवडून येईलही; पण इंदिरा गांधींचा राजकीय वारस होण्यासाठी आवश्यक असलेले नेतृत्वगुण त्यांच्यात यापूर्वी तरी दिसून आलेले नाहीत. येत्या पाच वर्षांत दोघांपैकी, एकाला तयार करण्याचा त्या प्रयत्न करतील आणि अगदी अशक्य झाले तरच घराबाहेरचा वारस शोधतील !

युवक-नेतृत्व विरुद्ध वृद्ध नेतृत्व असा संघर्ष इंदिरा कॉंग्रेसमध्ये निर्माण होईल का ? युवकांना अधिक जागा देऊन पक्षात त्यांचा प्रभाव वाढविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न या वेळी प्रथमच झाला तो संजयमुळेच झाला हे मान्य करायलाच हवे. लोकसभेतील इंदिरा कॉंग्रेस पक्षात आज आहे, विधानसभामध्येही युवकांना चांगले प्रतिनिधित्व मिळाले आहे. अनेक राज्यांचे मुख्यमंत्री संजयच्या शिफारशीने निवडले गेले आहेत; पण संजयच्या अभावी हा गट इंदिरा कॉंग्रेसच्या धोरणावर, कार्यक्रमावर कितपत प्रभाव पाडू शकेल ? इंदिरा गांधींवर प्रभाव पाडू शकेल असा नेता या गटाजवळ नाही. त्यामुळे युवक कॉंग्रेसचा प्रभाव कमी होण्याची शक्यता आहे असे काही निरीक्षकांना वाटते; पण युवकगट नाराज होऊ नये, आपण डावलले गेलो असे त्याला वाटू नये अशी दक्षता इंदिरा गांधी जरूर घेतील. एवढेच नव्हे तर पक्षातील उरल्यासुरल्या वृद्ध-नेतृत्वाची महत्त्वाच्या अधिकारपदावरून

पृष्ठ २२ वर

# गाझा ते गॅलिली

## लेखांक पाचवा । राजू पटवर्धन

# स्वप्न : बेन गुरियनचे आणि बेने इस्राइलींचे....

'खरं सागू तुम्हाला, पटवर्धन, मला इस्राइलला येऊन आता सत्तावीस वर्षं होऊन गेली; पण आता विचार करू लागतो तो माझं मला कळून चुकलंय की, भारत सोडला ही फार मोठी चूक आपण केली !'

'सॅम्सनसाहेब, मला तर वाटतंय्, तुम्ही इथे सुखात आहात, जगप्रसिद्ध हिब्रू विद्यापीठात तुम्ही मोठ्या हुद्द्यावर आहात, इस्राइल सरकारात तुमचं एवढं वजन आहे, मुलं सुस्थितीत आहेत, घर सुसज्ज आहे–देशांतर केल्यानंतर सुयश हे यापेक्षा वेगळं काय असणार ?' –मी.

'सुस्थिती, सुख आणि मानसिक आनंद या तिन्ही गोष्टी निरनिराळ्या आहेत. पहिल्या दोन गोष्टी मला इस्राइलमध्ये आता पुरेपूर मिळाल्या आहेत; पण तिसरी गोष्ट कधीही मिळणं शक्य नाही ! कदाचित ज्या ऐतिहासिक प्रक्रियेतून मी आणि माझ्यासारखे शेकडो बेने इस्राइली गेलो आहोत, त्या प्रक्रियेचा हा परिपाक असेल; पण हा आनंद मी गमावून बसलो आहे खरा !'

'पण असं का ?'

'कारण एकच–भारत हा किती *महान आणि मोठ्या मनाचा* देश आहे आणि हे माहात्म्य कशात आहे हे कळायला मला वयाची छपन्न वर्षं जावी लागली. अहो, जगात फक्त एकच देश असा आहे की जिथे ज्यूधर्मीयांचा छळ कधीही झाला नाही–तो देश म्हणजे भारत ! भारतानं आमचं काहीच वाकडं केलं नाही. आमच्यावर भारतात काहीही अन्याय झाला नाही–तरी आम्ही भारताला सोडून गेलो. आता हे भोवतंय् ! भारताचं मोठेपण हे गाड्या, टी. व्ही. सेट्स्, रिफ्रिजरेटर्स, एअरकंडिशनर्स, कॅल्क्युलेटर्स यांच्या संख्येत मोजता येण्यासारखं नाही. ते फार सूक्ष्मतरल पातळीवरचं आहे. जिव्हाळा, आपुलकी, भावनोत्कटता अशाचं ते एक शब्दापलीकडचं रसायन आहे.'

'पण हे इतक्या वर्षांनंतर तुम्हाला उमगलं हे का ?'

'त्यासाठी तुम्हाला आम्हा बेने इस्राइलींचा सरळ इतिहासच ऐकवावा लागणार ! आहे तयारी ?'

'अगदी अवश्य ! असा तर योग मला पाहिजेच होता. इस्राइल हा देशच असा आहे की किती नवनवीन दृष्टिकोनातून तो पाहिला तरी दर वेळेस नवेच पैलू दिसतात'

एवढं म्हणून मी सॅम्सन याना आवर्जून सांगितलं की, त्यानी सागितलेली कहाणी मी अतिशय सुयोग्य अशा व्यासपीठावरून भारतीयाना सागेन. आपल्याला उद्बोधक वाटेल अशीच आहे ही कहाणी.

भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या आधीची परिस्थिती अशी होती की, सर्व तऱ्हेने अल्पसंख्य हे ब्रिटिशाना 'आपले' वाटत. त्याना शक्य तेवढं चुचकारून ब्रिटिशानी भारतावर सत्ता गाजवली. हे ब्रिटिशाचं धोरण चांगलं होतं की वाईट होतं ही चर्चाच अप्रस्तुत आहे. कारण इतक्या छोट्या राष्ट्रानं भारताएवढ्या अवाढव्य देशावर राज्य करायचं, म्हणजे भारतीय जनतेतील गट एकमेकाविरुद्ध खेळवणं हा पहिलाच सुचणारा डावपेच ते खेळणार हे उघड होतं.

भारतीय ज्यूना ब्रिटिशानी असं सागितलं की, तुम्ही 'ज्यू' म्हणजे 'ख्रिश्चना'ना आणि त्याहूनही 'युरोपियनाना' म्हणजे 'आम्हाला' जवळचे. म्हणून भारतातल्या ज्यू लोकाना (यामध्ये कोकणी–मराठी बोलणारे 'बेने इस्राइली' आणि धर्म कडक पाळणारे कोचिनी ज्यू) *ब्रिटिशानी गुणवत्तेपेक्षा खूपच अधिक अशा* नोकऱ्या दिल्या. शिक्षणाकडे पाहिलं नाही, स्पर्धकाकडे पाहिलं नाही. त्यातून मांसाहार, मद्यपान इत्यादी साहेबी शिष्टाचार भारतीय ज्यूंना खूपच अवगत असल्यामुळं त्याची ब्रिटिशाशी गट्टी जमायला वेळ लागला नाही. तसंच सर्व भारतीय ज्यूची संख्या फार नसल्यामुळे (काही हजारच होती) त्यानी ब्रिटिशाशी केलेली जवळीक इतराच्या इतक्या डोळ्यावर आली नाही. तसंच भारतीय स्वातंत्र्यलढ्यात ह्या ज्यूनी कधीच रस घेतला नाही. एकूणच दृष्टिकोण ब्रिटिशांची सेवा करणं हा असल्यामुळं स्वातंत्र्याबद्दल एकूण औदासीन्यच होतं.

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळालं. लोकशाही राजवट आली. आता ज्यूना भीती वाटायला लागली की, आपलं 'खास' स्थान हे आता जाणार ! ब्रिटिश गेल्यावर आपला वाली कोण ? इतक्या आम भारतीयाबरोबर स्पर्धा सुरू झाल्यावर आपला टिकाव कसा लागणार ?

मग नवोदित ज्यूचं राष्ट्र इस्राइलला का जाऊ नये ?–वा ! सुरेख कल्पना. जायचंच. जगभरून ज्यूना आमंत्रण आहे, किबूट्स् टनावारी

आहेत, अमेरिकन पैसा लाटांनी येतोय्, आपल्याला इंग्लिश बच्चा-पैकी येतय्–म्हणजे इस्राइलमध्ये आपलं कल्याण होण्यासाठी सगळं काही वाढून ठेवलं आहे भारत असा आहे की, इथून आपण जाऊ नये म्हणून कोणतीही आडकाठी करणार नाही.

असा विचार करून भारतीय ज्यूंनी इस्राइलकडे रीघ लावली. त्यात काही निरक्षर मजूर होते, काही छोटे शेतकरी होते, काही आय्. टी. आय्.सारखा शिक्षणक्रम झालेले तांत्रिकी कामगार होते, काही ऑफिसर होते, काही बँकेतले कारकून होते वगैरे वगैरे.

सॅम्सनसाहेब जवळपूरच्या दारूगोळा-कारखान्यात बडे ऑफिसर होते. (हा कारखाना ब्रिटिशांनीच चालू केलेला आहे.) बंगला, गाडी, नोकर–रुबाबच रुबाब! नुकतंच लग्न झालेलं होतं. कशा-चीही कमतरता नव्हती; पण...सणक आली–इस्राइलला जायचं–किबूट्झ्मध्ये आरामात राह्यचं, चिक्कार पैसा मिळवायचा!

स्वप्नावर स्वप्नं रंगवून सॅम्सन–दांपत्य इस्राइलला १९५२ मध्ये पोहोचलं. कोणचं किबूट्झ् आपली वाट बघतंय् एवढाच विचार चाललेला. तिथे पोहोचतात, तर त्याना कळून चुकलं की, इथे फक्त सॅम्सनच आलेले नाहीत. येमेन, पोलंड, रशिया, कझाकिस्तान, तुर्कस्तान, इराक, इराण–इत्यादी अक्षरशः अठरापगड देशांचे हजारो ज्यू येऊन पोहोचलेत. त्यांच्यातले बहुसंख्य अक्षरशत्रू आणि मातृभाषेशिवाय कोणतीही दुसरी भाषा न येणारे! इथे सॅम्सनचं साहेबी इंग्रजी काय दिवे लावणार! पुन्हा इस्राइल सरकार 'हिब्रू शिका!' हे दोनच शब्द इंग्रजीतून सागणार. ते जाऊ दे. सॅम्सनना वाटलं हा एकाकीपणा तात्पुरता असेल, निदान आराम, सुखसोई तरी मिळतील! कसलं काय? त्यांची रवानगी इतर हजारोबरोबर ट्रँझिट् कॅम्पमध्ये झाली. ट्रँझिट् कॅंप म्हणजे हल्लीच्या भाषेत झोपड-पट्टी होती. पाचशे लोकांच्यात तीन संडास! बाथरूमची बोंब, रेशन-वर खाद्य–वाटप. झोपड्या म्हणजे दिव्यच! सॅम्सनना जबलपूरचा बंगला आठवू लागला आणि आठवण छळू लागली.

इतर ज्यूंना हा ट्रँझिट-कॅंपसुद्धा वरदानच वाटला. कारण त्यांच्या देशातून त्यांची हकालपट्टी तरी झाली होती किंवा छळ तरी झालेला होता. त्यापासून सुटका हे त्यांचं मुख्य ध्येय असल्यामुळे त्यांना ट्रँझिट्-कॅंप हा पुढल्या मंगल भविष्यकालासाठी टाकावं लागणारं एक आवश्यक पाऊल असंच वाटलं. मात्र सॅम्सनना हे डाचू लागलं की, भारतात अशी काय माझी दुरवस्था होती म्हणून मी हे सोसावं? कशासाठी हे आत्मक्लेश? कशासाठी ही आत्मवंचना?

मग वाटलं, लवकरच ही आपत्ती तरून जाईल. किबूट्झ्मध्ये प्रवेश मिळाला की झालं! पण किबूट्झ्मध्ये इतक्या सहजासहजी प्रवेश मिळणं नव्हतं. बेने इस्माइलीना किबूट्झ्मध्ये जवळजवळ मनाई होती. तिथे युरोपियन ज्यूंचं (आश्केनाझी ज्यूंचं) वर्चस्व होतं. ते भारतीय ज्यूंना जवळ करायलाच तयार होईनात! 'भारतात आम्हाला ज्यूद्वेष माहीत नव्हता. तो केवळ ज्यूंच्या असलेल्या इस्राइल देशात आम्हाला अनुभवायला मिळाला!' असा कटु विचार सॅम्सननी ऐकवला.

मिळेल ती नोकरी, देतील तो पगार, दिसेल ते घर अशी वणवण पुरी नऊ वर्षं केल्यानंतर सॅम्सनना हिब्रू विद्यापीठात ग्रंथालयात नोकरी मिळाली; स्वत:चं घर मिळालं. त्यांच्या इंग्लिश भाषेवरच्या प्रभुत्वाला पूर्ण वाव मिळेल अशी ही नोकरी होती. आता ते या ग्रंथालयाचे जे २० ग्रंथपाल आहेत (एकूण कर्मचारी ५००चे वर आहेत) त्यांपैकी एक आहेत. ही जागा खूप बहुमानाची समजली जाते. अर्थात् ही बढती सुखासुखी मिळालेली नाही बढतीपूर्वं एक चाचणी–परीक्षा होती. परीक्षक अर्थातच युरोपिअन ज्यू होते. एक बेने इस्राइलीला ग्रंथपाल होण्याचा बहुमान मिळतो आहे हे पाहून ते सॅम्सनवर जळफळत होते. परीक्षेत सॅम्सननी उत्कृष्ट कामगिरी केली; परंतु त्यांना 'नापास' हा किताब मिळाला! तेव्हा त्यानी परीक्षकाना धमकी दिली की, 'तुम्ही लिहिलेल्या मजकुराच्या गुणवत्तेप्रमाणे मार्क दिले नाहीत, तर मी 'जेरुसलेम पोस्ट' दैनिकामधून सर्व हकीगत प्रसिद्ध करीन!' ही धमकी ऐकून मात्र परीक्षक हादरले! त्यांनी सॅम्सनना पास केलं.

सॅम्सन यांच्या वैयक्तिक सुयशाची जर गोष्ट असती, तर ती इथेच संपली असती. मात्र त्यांची जी विशेष कहाणी आहे ती त्यांनी नेतृत्व केलेल्या बेने इस्राइलींच्या लढ्याची.

१९५० ते १९६२ ह्या वर्षांत बेने इस्राइली आणि कोचिनी ज्यू भारतातून इस्राइलमध्ये जातच राहिले. वांशिक भेदावरून त्यांच्या-विरुद्ध सतत कुरापती झाल्या. नोकऱ्यांत, उद्योगांत दुय्यम स्थान मिळत गेलं. सॅम्सन यांनी हे पाहिलं की, बेने इस्राइली हे मराठी-भाषिक ज्यू. ह्या दोन्ही गटामध्ये जास्त मागासलेले होते. त्यांचे एकूण शिक्षणाचे प्रमाणही खूप कमी असल्यामुळे प्रलोभनाला बळी पडण्याची शक्यता त्यांच्या बाबतीत जास्त. एकूण त्यांना सल्ला आणि नेतृत्व ह्या दोन्हीची गरज होती.

## संघटना बांधली

भारतीय ज्यूंना जो सगळ्यात जास्त त्रास दिला तो सनातनी ज्यू धर्मगुरू रॅबाय ह्यानी–ह्याचं वर्णन आधीच्या लेखात येऊन गेलंच आहे. रॅबायनी अशी भूमिका घेतली की, भारतीय ज्यू हे ज्यू नव्हेतच! कारण का तर म्हणे धार्मिक कृत्यं ते करतात, ती परंपरेला धरून नाहीत, म्हणून ती ग्राह्य धरता येणार नाहीत. तसंच सध्याचे लोक आपण ज्यू आहोत, असं म्हणत असले तरी त्यांचे आईवडील, आजा-आजी, पणजा-पणजी ज्यू होते कशावरून? मग त्यांची जबाब-दारी ही की, आपल्या चार पूर्वपिढ्यापासून आपलं 'ज्यू'त्व सिद्ध केलं पाहिजे. ते जर सिद्ध झालं नाही–ह्याबद्दल सुप्रीम कोर्ट म्हणजे स्वतः रॅबॉयच!—तर अर्जदार ज्यू नव्हेच आणि ज्यूच नव्हे म्हणजे इस्राइलचा नागरिक नव्हे, म्हणजेच त्याला मतदानाचा हक्क नाही, म्हणजेच त्याला मालमत्तेचा हक्क नाही—वगैरे आणि एवढं सव्यापसव्य करून तो ज्यू ठरलाच, तर त्याच्या धार्मिक संस्करणात झालेल्या चुकांचं क्षालन होण्यासाठी त्यानं सर्व ज्यूह्य धार्मिक विधी परत बरोबर कर्मकांडाप्रमाणे केले पाहिजेत.

सॅम्सननी हे ओळखलं की, हे सगळं नाटक आहे. अंतस्थ हेतू हा आहे की, 'काळ्या' भारतीय ज्यूंना वरचं स्थान—किंबहुना बरोबरीचंही स्थान—मिळू नये. मतदानाचाही हक्क नाही, मग या देशात राह्यचं तरी कशाला? शेवटी त्यानी ठरवलं की, हा अन्याय थांबवायचा असेल, तर त्याला एकच मार्ग आहे–तो म्हणजे संघटित लढा!

...आणि इथे तर बेने इस्राइलींची बाजू लंगडी होती बेने

इस्राइली मुख्यतः कोकणातले मूळचे लोक. त्यांनी इस्राइलमध्ये आपला खास कोकणी गुणधर्म नेला आहे आणि रुजवला आहे–तो म्हणजे भाडण्याचा. तिथल्या बेने लोकांची इतकी वैयक्तिक भांडणं होती की, सॅम्सनना त्या सर्वांना एकत्र आणणं ही गोष्ट सर्वांत अवघड वाटत होती. पुन्हा त्यांच्यापैकी पुष्कळ लोक हे इतके भित्रे होते की रॅबाय सांगतील ती दिव्यं करायला आणि मागतील ते पुरावे द्यायला त्यांची तयारी होती––'काही करा, पण आम्हाला ठेवा!' ही लाचारी वृत्ती होती सॅम्सनना माहीत होतं की, जोपर्यंत बेने लोकांत ही वृत्ती आहे तोपर्यंत रॅबाय लोक आणि इस्राइल सरकार तिचा पुरेपूर फायदा उठवणार, एकीकडे लाचारी आणि दुसरीकडे एकतेचा अभाव!

कोकणी दुही कशी असते यासंबंधी बेने इस्राइली लोकात एक किस्सा फार प्रसिद्ध आहे सॅम्सननी तो मला ऐकवला. दोन बेने इस्राइली शेजाऱ्यांना एक वरदाता भेटतो तो एकाला सांगतो की, तुला पाहिजे ते माग! मात्र अट एवढीच की तुला मिळेल त्याच्या दुप्पट तुझ्या शेजारी–मित्राला मिळेल! केवढी पर्वणी! शेजाऱ्याला वाटलं की, आपला मित्र स्वत.ला एक गाडी मागेल, म्हणजे आपल्याला दोन गाड्या मिळतील; पण त्यांचे दोस्त किती हुशार––ते म्हणाले, 'साहेब, माझा एक डोळा फोडा!' यावरून गेल्या वर्षी गणपती–पुळ्याला गेलो असता तिथल्या पुजाऱ्यांनी पुळ्याची करून दिलेली ओळख मला आठवली–गणपती–पुळ्याला ६०० कुटुंबं आहेत! पण भांडणं १५०० आहेत. ही कथा मी सॅम्सनना सांगितली तेव्हा ते इतके दिलखुलास हसले, की सोय नाही!

सॅम्सननी ठरवलं––१९६३ ऑगस्टचा काल–की सगळ्या बेने इस्राइलींना जेरुसलेममध्ये–जमवायचं. मागण्यांचा ठराव मांडायचा आणि क्नेसेटवर (इस्राइली लोकसभा) आम–मोर्चा न्यायचा. हे सगळं शक्यतो एक नाही तर दोनच दिवसांत उरकायचं. कारण जास्त वेळ दिला, तर बेने इस्राइलींची भांडणं आणि मारामाऱ्या सुरू व्हायला काय वेळ? या वेळी सॅम्सनना साहाय्यभूत ठरलेली मोठी घटना म्हणजे त्या वेळचं इस्राइलचं जे सरकार होतं–मजूर पक्षाचं सरकार होतं, पंतप्रधान होते लेव्ही एश्कोल–त्यानं बेने इस्राइलीच्या लढ्याला संपूर्ण पाठिंबा दिला. आबा एबान, आलोन इत्यादि नेत्यांनी आपली सहानुभूती कळवली. स्वतः आलोन हे नेते मोर्च्यात सामील झाले.

जवळजवळ तीन हजार बेने इस्राइली सबंध इस्राइलमधून जेरुसलेमला जमले. सॅम्सननी मांडलेले सर्व ठराव एकमुखाने मंजूर झाले. ते असे–

१ : आम्ही म्हणतो म्हणून आम्ही ज्यू आहोत. आमचं ज्यूत्व सिद्ध करण्याचा अधिकार कोणालाही नाही.

२ : आम्हाला सर्व इस्राइलींना मिळतात ते सर्व हक्क मिळालेच पाहिजेत.

३ : कोणतीही तडजोड नाही. तडजोड करण्यासारखं आम्ही काही केलेलंच नाही.

४ : रॅबाय आम्हाला मानणार नसतील, तर आम्ही बंड करून स्वत.चे रॅबाय निर्माण करू.

ऑगस्ट १९६३ मध्ये इस्राइलच्या तोपर्यंतच्या इतिहासात झाला नाही, एवढा मोठा हा मोर्चा झाला. 'जेरुसलेम पोस्ट' ह्या सुप्रसिद्ध दैनिकानं बेने इस्राइलींना संपूर्ण पाठिंबा दिला. मोर्चानंतर चीफ रॅबायची प्रतिमा जाळण्यात आली. शेवटी पंतप्रधान लेव्ही एश्कोल यांनी चीफ रॅबाय आणि सॅम्सन यांना चर्चेला बोलावलं. चर्चा तीन तास चालली होती सॅम्सननी स्वच्छच सांगितलं, 'रॅबाय जर मला म्हणणार असेल की, तुझं ज्यूत्व चार पिढ्यापासून सिद्ध कर, तर मी सिद्ध करीन की, रॅबाय स्वतः गेल्या चार पिढ्यापासून ज्यू नाही! आणि हे सिद्धताप्रकरण आणि दिव्य फक्त भारतीयानाच का? अमेरिकन ज्यूना का नाही?–चार पिढ्याचा निकष अमेरिकन ज्यूना लावा–त्याच्यातला एक तरी ज्यू निघेल की नाही देव जाणे!'

एश्कोलना सॅम्सनचं शांत, सभ्य व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे उदार, प्रगल्भ विचार अत्यंत आवडले. त्यानी त्याचं सर्व म्हणणं मान्य केलं आणि रॅबिनेटला स्वीकारायला लावलं. बेने इस्राइलींना सर्व हक्क मिळाले. तेव्हापासून आता १९८० पर्यंत खूपच सामाजिक क्षेत्रात त्यांनी जम बसवला आहे. आर्थिकदृष्ट्या सर्वजण सुखी आहेत. अर्थात मधूनमधून कुठेकुठे कुरबुरी, अन्याय होतात. ह्या सगळ्या-मधून सॅम्सनना मात्र कमालीची अस्वस्थता आली आहे. लढे होतात, अनेकांना शारीरिक, मानसिक, आर्थिक ताण सहन करावे लागतात, शेवटी विजयश्रीनं माळ घातली की, सार्थक झालंसं वाटतं, कृत-कृत्यता वाटते–तीच सॅम्सनना वाटत नाही. कारण ज्या ध्येयासाठी हे सर्व सोसलं, ते ध्येयच इतकं पवित्र, उदात्त होतं की नाही याची त्यांना आशंका वाटते. एक इस्राइली म्हणून आज त्याना जे भावनिक समाधान वाटतं, त्यापेक्षा किती तरी पट समाधान त्याना आता भारतात भेटीदाखल आलं की वाटतं. ते मात्र प्राजलपणे कबूल करतात–'मी भारतात असेपर्यंत ब्रिटिशर म्हणून राहिलो आणि आता इस्राइलमध्ये आल्यावर भारतीय म्हणून जगतो आहे! भारतीय जीवनाचा खरा अर्थ आता मला सापडला आहे.'

ज्या आपल्या बेने इस्राइली बाधवांसाठी सॅम्सननी एवढं रक्ताचं पाणी केलं त्याच्या आजच्या वृत्तीनं ते आणखीच विषण्ण झाले आहेत. ही मंडळी त्यांना कृतज्ञ तर राहिली नाहीच; पण त्याचा अत्यंत वाईट शब्दात दुस्वास करू लागली आहेत. कारण का तर ह्या 'XXX सॅम्सननं सरकारात वशिला लावून आम्हाला हे दिलं नाही, ते दिलं नाही.'

भावनिक सौख्य इस्राइलमध्ये काय नाही आणि भारतात काय आहे ह्याचं उत्तर मला दिलं श्रीमती एलिझाबेथ नॅश या सत्तर वर्षांच्या बाईंनी. सात वर्षांपूर्वी त्यांचे दोन्ही मुलगे मुबई सोडून इस्राइलला स्थायिक झाले. पती आधीच दिवंगत झालेले मुलीची लग्नं झालेली. एकट्या एलिझाबेथबाई मुबईला काय करणार? नाइलाजानं त्याही इस्राइलला स्थायिक व्हायला गेल्या. मला म्हणाल्या, 'माझ्या मुलांचं-सॅमी आणि सॉली–ठीक आहे. दिवसभर बाहेर जातात, पैसे मिळवतात; पण मी सत्तराव्या वर्षी इथे नव्या जीवनाची सुरुवात कुठल्या उमेदीनं करू? मला मराठीशिवाय भाषा येत नाही. हिब्रू कुठं, बोलू कुठं? नवीन मैत्रिणींचं सर्कल कुठं निर्माण करू? मुबईला आतेभावंडं, मामेभावंडं, मित्र-मैत्रिणी–किती गोतावळा होता आमचा! कसाही वेळ जायचा आमचा–इथे वेळ जाता जात नाही. बरं, शेजारणी-शेजारणींनी गप्पा करणं, एकमेकींना मदत करणं हे काहीच नाही. परवा ही माझी सून

बाळंत व्हायला आली, तर शेजारणीला सांगितलं जरा मदतीला ये, डॉक्टरला फोन कर–काही केलं नाहीन्. माझ्यासारखं म्हातारं मनुष्य आजारी पडलं, तर हॉस्पिटलात वाचवण्याची पराकाष्ठा करतीलच अशी काही खात्री मला वाटत नाही. आज मला इस्राइलमध्ये राहून एकच आनंद आहे–तो म्हणजे ६५ वर्षांवरच्या सर्व इस्राइलींप्रमाणे मला दर महिना पाच हजार लिरा (म्हणजे एक हजार रुपये) पेन्शन मिळते आम्ही चौघी-पाच जणी दहा दहा महिन्यांचं पेन्शन साचवतो–आणि दरवर्षी इंडियाला जाऊन येतो. तेवढाच एक निर्मळ विरंगुळा मिळतो मला!'

एलिझाबेथबाईंचे चिरंजीव सॉलोमन नॅश यांची तर त्याहून केविलवाणी स्थिती आहे. हे गृहस्थ संगीताचार्य कै. मनहर बर्वे यांचे पट्टशिष्य. मुंबईच्या क्लासमध्ये मनहरजी नसताना ते विद्यार्थ्यांना शिकवीत असत. भारतीय शास्त्रीय संगीताचा हा इतका वेडा की, आमच्या दोन दिवसाच्या सहवासात संगीताशिवाय बोलणंच निघालं नाही. इस्राइलमध्ये त्याच सतारीचं आणि ख्यालाचं वेड हे 'वेड'च ठरतं! त्याच्या मुलाना 'रॉक एन रोल' अधिक निकटचं वाटतं. सॉलोमन म्हणाला, 'संगीत हे त्या त्या प्रदेशात, संस्कृतीत फुलतं. इथे आपले राग आळवणं म्हणजे मोकळ्या थिएटरमध्ये जलसा केल्यासारखं होतं. साला इंडिया नही छोडना था–लेकिन इंडिया में पैसा कुठे आहे? इथं साला पैसा भरपूर आहे तो सोडवत नाही!'

बेने इस्राइली ही एक शोकांतिका आहे. इस्राइल हे एक प्रयोगशाळेसारखं राष्ट्र आहे. ज्यूचं राष्ट्र म्हणून त्याचे नागरिक हे एकजिनसी बनत आहेत–कष्टाळू, पराक्रमी, मात्र अधिकाधिक पाश्चात्य सुखाकडे प्रवण. इस्राइलला 'मेल्टिंग पॉट' म्हणतातच–इथे सर्व जगभरातून आलेले आपले अस्तित्व वितळवून टाकतात आणि एकजिनसी इस्राइली जीवनरसात एकजीव होतात. ह्या वितळण्याच्या प्रक्रियेसाठी जे ज्यू लागत होते, त्याचा एक क्लासिकल प्रकार होता. धार्मिक वृत्ती अशा जोपासलेल्या की जेरुसलेमला पोहोचलं की, मोक्ष मिळाल्याचा आनंद व्हावा, आर्थिक स्थिती अशी की, स्वदेशातल्या लोकानी मत्सर करावा, सामाजिक स्थिती अशी की, स्वदेशाच्या नागरिकांनी 'आज हाकलू की उद्या' अशी वागणूक दिलेली, बौद्धिक स्थिती अशी की, इतर समाजापेक्षा जरा वरचढ–हे होते 'क्लासिकल' ज्यू लोक. हे पॅलेस्टाइनला वाळवंटाचं नंदनवन करण्याचं स्वप्न बघून आले. तेल-अव्हिव्ह ते हैफा चालत गेले. 'हीच माझी भूमी' या ठाम समजुतीतून ढळले नाहीत. थोडक्यात हे सगळे होते स्वप्नाळू उद्गाते. (Dreaming Pioneers) इस्राइलचं स्वप्न पाहिलं ह्या उद्गात्यानी आणि त्या स्वप्नाप्रमाणे इस्राइल राष्ट्र उभं केलं. हे स्वप्न पडलेल्यातली सगळ्यात प्रमुख व्यक्ती म्हणजे इस्राइलला पितृस्थानी असलेले नेते स्वर्गीय डेव्हिड बेन-गुरियन.

### डेव्हिड बेन गुरियन

बेन–गुरियन यांचा जन्म १६ ऑक्टोबर १८८६ मध्ये प्लोन्स्क, पोलंड इथे झाला. वयाच्या तिसऱ्या वर्षापासून हिब्रूचे धडे घेतलेले डेव्हिड बेन–गुरियन हिब्रूचे पुढे विलक्षण अभिमानी, किंबहुना हट्टाग्रहीच झाले. पोलंडमध्ये सतत होत असलेल्या ज्यूंच्या छळामुळे इस्राइल–भूमीला जायचं या कल्पनेचं बाळकडूच तरुण डेव्हिडला मिळालं. उच्च शिक्षणासाठी रशियाला जायचा बेतही तिथल्या ज्यू-विरोधी वातावरणामुळं डेव्हिडनं रद्द केला. वयाच्या १८ व्या वर्षीच एका पत्रात त्यानं आपलं जीवितकार्य ठरवून टाकलं–"मला कळून चुकलंय की आपल्या इस्राइल–भूमीला आपल्याला लवकरच जायला मिळणार आहे. त्यासाठी आपण झगडलं पाहिजे!" आपल्या आयुष्यात पुढं बेन–गुरियन अनेक भाकितं करणार होते, त्यापैकी हे पहिलंच होतं. आश्चर्य असं की, त्याची बहुतेक सर्व भाकितं तंतोतंत खरी ठरली!

१९०६ मध्ये ते हैफाला आले प्रथम त्यानी ठरवून टाकलं की, सुरुवातीला राजकीय कार्याकडे मुळीच लक्ष द्यायचं नाही. इस्राइलमध्ये वास्तव्य करून तिथली जमीन कसणं हाच खरा ज्यूधर्म अशी आपल्यापुरती त्यांनी व्याख्या केली. तिथे संत्र्याच्या बागेत मजूर म्हणून एक वर्ष काम केलं. तिथे कंटाळा आला, मग वाइन बनवणाऱ्या मजुराची संघटना उभी केली एवढं होईतो मलेरियानं ग्रासलच. मग ते हवापालटासाठी गॅलिलीला गेले. तिथे आपल्या स्वप्नातलं समाजवादी ज्यू-जीवन त्यांनी उभारलं. तिथे त्यानी सेजेरामध्ये १९०७ मध्ये आपलं दुसरं भाकित केलं, "कधी ना कधी अरबाबरोबर लष्करी मुकाबला होणार आहे. आपल्याला तयारीत राहलाच हवं!"

पुढच्या चाळीस वर्षांत ब्रिटिशांशी वाग्युद्धं, ज्यूंचं संघटन, अरबांशी झगडा, इतिहास, तत्त्वज्ञान यांचा अभ्यास, सुमारे ८–९ भाषांचा व्यासंग, ज्यू-धर्मशास्त्राचा अभ्यास, जगव्यापी ज्यू संस्थाचं नेतृत्व इत्यादी अनेकविध आघाड्या यशस्वीपणे सांभाळल्या.

दुसरं महायुद्ध संपलं. बेन–गुरियननी आपलं तिसरं भाकित केलं, "आपल्या नवजात राष्ट्रावर अरब राष्ट्रं नक्की हल्ला करतील!" १९४८ उजाडलं. इस्राइलच्या स्थापनेची घोषणा बेन–गुरियन करणार एवढ्यात त्याना अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री आणि इस्राइलचे सन्मित्र जन. जॉर्ज मार्शल याचा तातडीचा निरोप आला – "तुम्ही इस्राइलच्या स्थापनेची घोषणा करणार आहात; पण एक मित्र म्हणून तुम्हाला सांगतो–तुम्ही हे धाडस करू नका! आम्हाला अगदी खात्रीशीर बातमी कळलीय–अरब देश तुमच्यावर लागलीच प्रचंड हल्ला करणार आहेत. त्यांच्याकडे सेनादल तुमच्याहून खूप आहे. त्याच्या मानाने तुमच्याकडे शस्त्रं जवळजवळ नाहीतच. मला भीती वाटते की, तुमचं नवजात राष्ट्र ही अरब राष्ट्रं थोडक्या वेळात नष्ट करतील! थोडा–थोडे दिवस थांबा!" बेन–गुरियन याचा निश्चय अटळ होता. त्यानी स्वतंत्र इस्राइलच्या जन्माची घोषणा केलीच केली आणि नंतर तुटपुंज्या इस्राइली सेनेनं सर्व अरब राष्ट्रांचा पराभव केला. या संबंधात त्यांनी लिहून ठेवलंय, "मार्शल माझा मित्रच होता. त्यानं सांगितलेलं काही खोटं नव्हतं. संख्याबळात आम्ही तोकडे होतो, शस्त्रास्त्रांत नगण्य. फक्त मार्शलला एक माहीत नव्हत– आम्ही जसं स्वतःला ओळखतो तसं तो ओळखू शकत नव्हता. प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यावर काय कर्तृत्व दिसू शकतं हे आमचं आम्हाला माहीत होतं!"

अरबाच्या शत्रुत्वाचा त्यांनी कधीच बाऊ केला नाही. त्यांनी बेधडक लिहून ठेवलं आहे की, अरबाच्या सतत शत्रुत्वामुळे इस्राइलचा सतत फायदाच झाला, तर अरबाचा सतत तोटाच झाला. उदाहरणार्थ,

परंपरेनं जखडून गेलेल्या ज्यू समाजाला सामाजिक आणि आर्थिक क्रांतीप्रत नेण्याचं काम अप्रत्यक्ष रीतीनं अरबानी केलं. सतत शत्रुत्वामुळे अरब मजूर ज्यूना मिळेनासे झाले. खूपदा मनविरुद्धच—खड्डे खणणे, रस्ते करणे, शेतमजुरी ही कामं करावीच लागली. दुकानदार आणि बुध्दिवादी समाज गटाला असं कष्टाळू जीवन एरवी सुखासुखी जगायला लावता येणं अशक्य होतं. १९३६ मध्ये जाफा या तेव्हाच्या सर्वांत मोठ्या बंदरातल्या अरब मजुरानी संप केला. (पहिल्या लेखाकात उल्लेख आलेला हाज अमीन या संपाचा पुढारी होता.) बेन–गुरियननी ठरवून टाकलं, "संप कितीका चालेना. आपण तेल–अव्हिव्हला दुसरच बंदर बांधू!" मग कोणाच्याही विरोधाला न जुमानता त्यानी तेल–अव्हिव्ह बंदर बांधलं. ज्यू मजूर बंदरात नव्हतेच, तिथे त्यानी सर्व ज्यू मजूर उभे केले आणि बंदर दिमाखात चालू झालं. अरबानी जर इस्राइलशी सख्य केलं असतं, तर इस्राइलनं एवढा अफाट पैसा आपल्या जमिनीची उत्पादकता वाढवण्यात खर्च केला नसता. अन्न व सर्व शेतीमाल अरबाकडून विकत घेतला असता. म्हणजे इस्राइलचा वाळवंटी भाग हा वाळवंटच राहिला असता. आपला देश सुधारण्याची घाईच आम्हाला झाली नसती—आम्ही आळसटलो असतो!

इस्राइलचं स्वप्न आपण जागवीत आहोत याचा बेन–गुरियनना विलक्षण अभिमान होता. १९१५ चा सुमार. डेव्हिडनं रशियाला आपल्या वडिलांना एक पत्र लिहिलं होतं. अनेक वेळा ते परत आलं. शेवटी जाफाहून घोडागाडीनं ते १०० मैल दूर असलेल्या जेरुसलेमला गेले. तिथे रशियाला जाणाऱ्या बोटीत पत्र टाकलं एकदाचं! घोडागाडीनं हाडं खिळखिळी केली होती—मग परत जाफाला पायी गेले. हे कष्ट, हे क्लेश सोसताना त्याना एक आनंद होत होता की, पुढे आपण जे राष्ट्र निर्माण करणार आहोत, त्याचा पायाच आपण घालतो आहोत. मात्र एक भान त्यानी ठेवलं की, आपण जाफा–जेरुसलेम पायी गेलो आणि त्यात आनंद मानला म्हणून पुढच्या पिढ्यांनी तसंच केलं पाहिजे!

इस्राइली ज्यूनी काय आदर्श ठेवावा याबद्दल त्यांनी एक सोपा संदेश तयार केलेला होता—"Not Masada : Not Vichi." म्हणजे मसादा कहाणीसारखी आत्महत्याही करायची नाही आणि फ्रेंच व्हिचीं सरकारसारखं लोटांगणही घालायचं नाही—संयम आणि स्वाभिमान दोन्ही टिकवायची!

त्याच्या आयुष्यात असे अनेक क्षण आले की जेव्हा बेन–गुरियन विरुद्ध जग असाच सामना चालू होता. (खुद्द इस्राइलमधले राजकीय नेते त्याच्या विरुद्ध होते). १९५२ साली पश्चिम जर्मनीनं दुसऱ्या महायुद्धात ज्यूंच्या केलेल्या हत्याकांडाबद्दल इस्राइलला नुकसानभरपाई देऊ केली. तत्संबंधीच्या कराराला बेन–गुरियननी पूर्ण पाठिंबा दिला. या वेळी इस्राइलमध्ये संतापाची लाट उठली. जर्मनांशी कुठल्याही तऱ्हेचे संबंध ठेवायला लोकमताचा प्रखर विरोध होता. सर्वांत जालीम विरोध केला तो सध्याचे पंतप्रधान मेनाखम बेगीन यांनी. जर्मनांशी बोलणी करून मदत स्वीकारल्याबद्दल त्यानी बेन–गुरियन याना 'ज्यूचे खुनी' म्हटलं! या वेळेला त्यानी सांगितलं की, नाझी जर्मनानी खुनी कृत्ये केली, त्याबद्दल त्याच्या पुढच्या पिढ्याना दोष देणं हे पूर्ण चूक होईल. तसंच ज्यूचं झालेलं नुकसान भरून काढणं ही मुख्य जबाबदारी आहे त्यासाठी जे हातभार लावतील तो स्वीकारलाच पाहिजे! पिढ्यान् पिढ्या शत्रुत्व करण्याला ते नेहमीच विरोध करीत. १९५६ च्या इजिप्तबरोबरच्या युद्धानंतर त्यानी मार्शल टिटोच्या मध्यस्थीनं इजिप्तचे अध्यक्ष नासर यांच्याबरोबर बोलणी करण्याचा हरतऱ्हेनं प्रयत्न केला. बेगीन–सादात भेट १९७७ मध्ये झाली. त्याऐवजी नासर–बेन–गुरियन भेट १९५६-५७ मध्ये झाली असती तर मध्यपूर्वेचा इतिहास वेगळाच झाला असता! पण नासरांनी बेन–गुरियनना भेटायला कठोर नकार दिला!

सतत अभ्यास हा एक त्याचा छंद होता. मग आपण कधी त्या अभ्यासाला सुरुवात केली याकडे ते कधीच बघत नसत. साठाव्या वर्षी त्यानी प्राचीन ग्रीक, स्पॅनिश आणि आधुनिक फ्रेंच शिकायला सुरुवात केली आणि त्यावर प्रभुत्व मिळवलं. प्लेटो–ॲरिस्टॉटल तर त्यानी आत्मसात केलेलाच होता. पुढे अरबांशी युद्ध सुरू झाल्यावर युद्धशास्त्राचा अभ्यास त्यानी केला. त्याचा एक विशेष म्हणजे ते डिक्टेशन देत नसत, स्वतः लिहीत. प्रसंगी २५-३० पत्रे एका तासात ते लिहीत. भाषणासाठी कोणताही उतारा उद्धृत करायचा झाला (मग तो बायबलमधला असेल, बुद्धाचा असेल, प्लेटोचा असेल) तर तो स्वतः धुंडाळीत.

आपल्या सहाध्यायाबद्दल ते कधीही टीकाटिप्पणी करीत नसत. मात्र त्यांना प्रत्येकाबद्दल काटेकोर तपशीलवार माहिती असे. ही माहिती योग्य वेळी सहज बोलून ते सहकाऱ्याना चकित करीत.

१९७३ मध्ये त्याचं निधन झालं, तेव्हा सगळ्यांनी असे उद्गार काढले की, इस्राइलच्या राजकारणात यापुढे इतका व्यासंगी, इतका बुद्धीला अधिष्ठान देणारा, इतका संयमी नेता कधी होणंच शक्य नाही! इस्राइलला तुम्ही उतरलात की, पहिली पाटी दिसते 'बेन-गुरियन एअरपोर्ट! पुढे जसजसा आपण इस्राइल बघतो, तसतसे त्याचे स्वप्न साकार झाल्याचे दिसते.

बेने–इस्राइलीवर अन्याय झाला असेल; पण त्यांची खरी शोकांतिका ही आहे की, त्याना बेन-गुरियन आणि त्यांचे स्वप्न ही कधी उमजलीच नाहीत. कारण त्याना असे 'क्लासिकल ज्यूचं स्वप्न कधीही पडलं नाही. ते स्वप्न पडले नाही, कारण भारतात ते सुखी होते. कोणत्या तरी अभिलाषेने ते इस्राइलला गेले. इतर स्वप्नाळू ज्यूना नंतर झालेले क्लेश हे कष्ट वाटले नाहीत. भारतीय ज्यूना वाटले. कारण हे कष्ट सोसून त्यातून काही नवीन निर्माण करण्याची त्याची मानसिक तयारीच नव्हती. इस्राइल म्हणजे 'खाना पीना मजा करना' अशी कल्पना करून गेले आणि त्याचा भ्रमनिरास झाला. सिडनी रूबेन यांचा उल्लेख तिसऱ्या लेखाकात आलेला होता. यानी मला असे अनेक बेने इस्राइली दाखवले की जे इस्राइलमध्ये 'दारू, दारू' करून स्वनाश करून घेत आहेत. काहीचं गैरवर्तन, 'इस्राइली ड्रीम' चा अभाव, आणि पूर्वग्रह यामुळे बेने इस्राइलीचं भवितव्य उज्ज्वल वाटत नाही. आता अशी परिस्थिती आली आहे की, सॅम्सन, सॉलोमन, नॅश याची मुलं तिकडेच जन्मली आहेत. त्यांना भारतीय संस्कृतीची मूल्यं ती काय याची कल्पनाच नाही, त्यामुळे ती मेल्टिंग पॉटमध्येच जाणार. आईवडिलाना भारताबरोबरचा स्नेहाचा धागा तुटल्याचे दु:ख होतंय, पण आता तो जोडणे अशक्य आहे, कारण त्याच्या मुलाना भारतात स्थायिक होणे अशक्यच वाटेल. पुन्हा सगळी मिळून बेने इस्राइलीची संख्या फार

फार तर ३००० असेल (भारतातली धरून) एवढ्यांसाठी भारत सरकार आकाश-पाताळ एक करून त्यांचे हितसंबंध राखील असे काही नाही. आणखी २५-३० वर्षांनी 'बेने इस्राइली' ही वसाहत नामशेष होऊन इस्राइलच्या इतिहासातले एक पान होईल अशी खेद-जनक भविष्यवाणी वर्तवता येईल.

एक गोष्ट मला मुद्दाम नोंदवावीशी वाटते ती ही की, बेने इस्राइली कुटुंबातून माझे जे आदरातिथ्य झाले, ते इतके उदार आणि हेलावून टाकणारे होते, की त्याला तोडच नाही ! सॅम्सन, नॅश यांच्या पुढच्या पिढ्यांनी निदान एवढे तरी भारतीयत्व टिकवले तरी खूप होईल !

भारतीय संस्कृतीमधले काही तरी सत्त्व अल्पांशानं का होईना पण टिकवून, त्याचा प्रसार करून इस्राइली समाजात समरस होण्याचा विशेष उल्लेखनीय प्रयोग शिमशोन केमकर आणि त्यांच्या कुटुंबियांनी केला आहे. केमकरसाहेब एच्. एम्. व्ही. चे चीफ रेकॉर्डिस्ट आणि वाद्यवादक होते. तीन वर्षांपूर्वीच ते अॅशदोद, इस्राइलला स्थायिक झाले आहेत. तिथल्या एका रॉक एन्-रोल ग्रुपबरोबर ते व्हायोलिन आणि सतार वाजवतात. त्यांची एक नवी ध्वनिमुद्रिका अतिशय लोकप्रिय होऊन तिच्या पस्तीस हजार प्रती खपल्या आहेत ! या ध्वनिमुद्रिकेत 'यलादीम, यलादीम्' हे मुख्य हिब्रू गाणं आहे. त्याला शिमशोननं आपल्या पारंपारिक मराठी लावणीची चाल लावली आहे आणि त्यावर कल्पनारम्य असं पाश्चिमात्य संगीत वाजवलंय् दोन अमेरिकन गिटारवादकांनी ! असा हा एक विचित्र आंतरराष्ट्रीय संच आहे. त्यामधून निर्माण झालेले संगीत हे भारतीय आहे असे म्हणण्याचे धाडस माझं होणार नाही इतकं ते विचित्र आहे. मात्र आपल्या चालीचा धागा त्यात आहे. पाश्चिमात्यांकडून आपल्याकडे सर्व तऱ्हेचे सांस्कृतिक आक्रमण होतच आहे, त्या दृष्टीने थोडे आपले आक्रमण होतंय हे काही वाईट नाही.


बेने इस्राइलींचा समूह म्हणून एक मोठा दोष म्हणजे त्यांच्याकडे भारतीय संस्कृतीचा असा एखादा चटकन् डोळ्यात भरणारा ठेवा नाही. असा ठेवा घेऊन आले आहेत ते रशियन आणि हंगेरियन ज्यू लोक. त्यांच्यामध्ये अतिशय गुणी असे संगीतज्ञ व वाद्यवादक (विशेषत: व्हायोलिनवादक) आहेत. त्यांनी दक्षिण इस्राइलमध्ये बेरशेव्हा या शहरात वास्तव्य करून आपला आता जगप्रसिद्ध होऊ पाहणारा सिम्फनी ऑर्केस्ट्रा काढलाय. यामुळे त्यांचे नाव सर्वतोमुखी झालंय. त्यांच्यातले अधिकतम गुणी वाद्यवादक 'इस्राइली फिलहार्मॉनिक ऑर्केस्ट्रा' ह्या जगातल्या पहिल्या क्रमांकाचा गणला गेलेल्या ऑर्केस्ट्रात गेले आहेत. 'इस्राइली फिलहॉर्मोनिक' हे सध्या पाश्चात्य शास्त्रीय संगीताचे तीर्थक्षेत्र बनले आहे.

देशोदेशींचे सर्वोत्कृष्ट वादक या वाद्यमेळात आहेत. ह्याच्याशी भारताचे विशेष जवळचे नाते असण्याचे कारण ह्याचे निर्देशक जगात सध्या पहिल्या गुणवत्तेचे धनी असलेले मूळचे भारतीय झुबिन मेहता आहेत. त्यांची म्हणे अतीव इच्छा आहे की, 'इस्राइली फिलहार्मॉनिक मुंबईला आणायचा ! दुर्दैवानं आज अशी परिस्थिती आहे की हा वाद्यमेळा कैरोला जाईल, पण मुंबईला येणार नाही !

बेने इस्राइलींमध्ये एकतेचा अभाव हा मोठा दोष आहे. तो कोचीनी ज्यूंमध्ये नाही. त्यांच्यात विलक्षण एकवाक्यता आहे. त्यांनी बेरशेव्हाजवळ आपले स्वतंत्र मोशाव्ह वसवले असून ते आदर्श मोशाव्हातले एक गणले जाते. अर्थात् बेनेचे इतर सर्व प्रश्न त्यांनाही भेडसावतातच.

इस्राइलला आपण मेल्टिंग-पॉट् म्हणू, प्रयोगशाळा म्हणू. त्यातून नेत्रदीपक असे यश दिसेल, स्वाभिमानी नागरिक दिसतील. मात्र सॅम्सनसाहेबांच्या प्रश्नाला उत्तर देणारे कोणीही भेटणार नाही "आम्ही भारताला का सोडून आलो ?"

[ क्रमश: ]



हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?

राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....

नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी (सचित्र)

किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

कथा

# दान !

प्रा. रा. म. बिवलकर

शुभदा हॉस्पिटलच्या गेटशी रिक्षातून उतरली आणि रिक्षेचे बिल चुकते करून आपली पर्स खाद्याला अडकवीत गेटमधून डॉ. शिरवाडकराच्या पोर्चकडे चालू लागली. पोर्चमध्ये एक गाडी उभी होती. निळ्या रंगाच्या ॲम्बॅसडरमध्ये ड्रायव्हरच्या जागी डोळ्यांना गॉगल लावलेला, करड्या रंगाचा सफारी सूट घातलेला, एक मध्यम वयीन तरुण बसला होता. त्याच्या शेजारच्या सीटवर बसलेली मध्यमवयीन तरुणी त्या दोघाना पोचवायला गाडीपर्यंत आलेल्या डॉ. शिरवाडकराशी काही बोलत होती. शुभदा पुढे झाली तोच ती गाडी स्टार्ट झाली. 'अच्छा' चे हात हालवले गेले. एक सुंदर उजवे वळण घेऊन एक्झिटच्या गेटने गाडी डौलदारपणे हॉस्पिटलच्या बाहेर पडून रस्त्याला लागली. डॉ. शिरवाडकर त्या जात्या गाडीकडे पाहात पोर्चमध्ये अर्धमिनिट रेंगाळले असे वाटले. त्यांचा चेहरा विचारमग्न दिसत होता. 'गुड आफ्टरनून डॉक्टर !' असे म्हणत शुभदाने त्याच्या क्षणिक विचारतंद्रीतून त्यांना बाहर काढले. डॉक्टर हसत म्हणाले 'या, या तुमचीच वाट पहात होतो.' आणि ते आपल्या रूमकडे जायला वळले.

शुभदाने गाडीतून जाणाऱ्या त्या जोडप्याला चुकमुकते पाहिले होते. गाडीच्या मागच्या काचेतून झालेल्या त्या मध्यमवयीन स्त्रीच्या दर्शनाने तिच्या जुन्या स्मृती चाळवल्या होत्या. ह्या स्त्रीला आपण कुठे तरी पाहिले आहे. कुठे ते नक्की आठवत नव्हते. आठवण जागवायला वेळ नव्हता. डॉक्टराच्या बुटाचा आवाज व्हराड्यात दूरवर गेल्याची जाणीव होताच शुभदा त्याच्या पाठोपाठ त्यांच्या रूमकडे गेली. डॉक्टरांच्या रूमचा स्प्रिंगचा दरवाजा ढकलून शुभदा आत शिरली. बाहेरच्या खोलीत काही पेशंटस डॉक्टराच्या बोलावण्याची वाट पहात बसले होते. शुभदाने एक धावती नजर त्याच्यावर टाकली आणि डॉक्टराच्या रूमच्या दाराशी त्याच्या अपॉइंटमेंट सांभाळणाऱ्या वॉर्ड बॉयकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले.

'आपण मिसेस शुभदा गोखले का ?' त्याने विचारले.

शुभदाने मानेनेच होकार दर्शविला.

'आपण आत जा. डॉक्टर आपलीच वाट पहात आहेत.' शुभदा थोडीशी हसली. म्हणाली, 'भेटले मला;' आणि डॉक्टराच्या रूमचे दार ढकलून ती आत शिरली.

'बसा. आज काय काम काढले एवढे ? तुमचा फोन आला, तेव्हापासून मी विचार करतोय.'

'डॉक्टर, आत्ता त्या निळ्या ॲम्बॅसडर गाडीतून ज्या बाई गेल्या त्या कोण ?'

'डॉक्टर मोठ्याने हसत म्हणाले, 'त्याची साडी आणि गाडी मनात भरलेली दिसतेय!'

'तसे नाही, त्या बाईंना मी कुठे तरी पाहिलंय. खूप जुनी ओळख असावी असे वाटतंय. पण काही आठवत नाही!'

'म्हणूनच तुमचे पाय रेंगाळले एवढे. मी म्हटले, अजून कशा ह्या आत येत नाहीत ?'

'पण त्या बाईंचे नाव काय ?'

'शुभदाताई' तुम्ही याच चौकशीला आला आहात की काय ? पण माझी खात्री आहे. त्या बाईंची आणि तुमची ओळख असणे कठीण आहे. तुम्ही गेली वीस वर्षे तरी या गावात आहात. त्या मात्र नुकत्याच इथे बदली होऊन आल्या आहेत. त्याचे नाव, लीना देशपांडे. इथे बदलून आलेल्या नव्या कलेक्टरसाहेबाच्या त्या पत्नी. मोठी उमदी जोडी आहे. ऑफिसर्स क्लबच्या टेनिस कोर्टावर त्याची माझी भेट झाली. दोघे ब्रिजही छान खेळतात. अनेक खेळात त्यांना रस आहे. रेव्हेन्यूचा माणूस असूनही अनिल देशपाडे फर्स्टक्लास स्पोर्ट आहेत !'

'त्याच आपल्याकडे काय काम ?'

'शुभदाताई, गायनॉकॉलॉजिस्टकडे कुणाचे काय काम असणार ? अरे हो, पण तुम्ही आज का आला आहात हे सांगितलंच नाही !'

शुभदा हसत म्हणाली, 'गायनॉकॉलॉजिस्टकडे माझे तरी दुसरे काय काम असणार ?'

ती गंभीर होत पुढे म्हणाली, 'त्यात तुम्ही आमच्या कुटुंबाचे डॉक्टर, सल्लागार, मित्र, हितचिंतक. त्यामुळं तुमचा एका गोष्टीबाबत सल्ला घ्यायला आले आहे; पण डॉक्टर, लीना देशपांडे कशाकरिता आल्या होत्या ?'

'शुभदाताई, दुसऱ्या कुणी असा प्रश्न माझ्या पेशंटबाबत विचारला असता तर प्रोफेशनल एटिकेट म्हणून ह्या प्रश्नाचे उत्तर देणे मी नाकारले असते. कुणालाही अशा गोष्टी डॉक्टरने उघड करणे आवडणार नाही.'

'सॉरी डॉक्टर, वाटले तर मलाही सांगू नका. पण का कोण जाणे लीना देशपांडे याच्या चुटपुटत्याच दर्शनाने त्याची-माझी खूप जवळची ओळख असावी असे मला राहून राहून वाटतंय. ही पूर्वाश्रमीची लीना देशमुख तर नव्हे ?'

'हो ! एके काळच्या नॅशनल टेनिस चॅंपियन मिस लीना देशमुख त्या ह्याच. तशीच त्यांची ओळख अनिल देशपांडे यानी मला करून दिली होती.'

'अनिल देशपांडे म्हणजे—आमच्या कॉलेजच्या क्रिकेटटीमचा कॅप्टन. इंटर युनिव्हरसिटीसाठीही त्याची निवड झाली होती. पुढे लीनाचे आणि त्याचे लग्न झाल्याचेही समजले होते.'

'म्हणजे ? मिस्टर अ‍ॅन्ड मिसेस देशपाडे तुमचे क्लासमेट आहेत ?'

लीना देशमुख माझ्या वर्गात होती. अनिल आम्हाला सीनियर.' शुभदाच्या आठवणी जाग्या झाल्या होत्या. 'का आली होती ती दोघेजणे इथे ?'

'आता तुम्ही मैत्रीणीच आहात तेव्हा सागतो. दे हॅव नो इशु !'

'डॉक्टर, काय सांगता काय? इतक्या सुदर सुदृढ जोडीला अजून मूलबाळ नाही?'

'असतात अशी काही दुर्दैवी जोडपी. जाऊ द्या. आपण तुमच्या कामाकडे वळू!'

'पण डॉक्टर, का झाले नाही लीनाला मूलबाळ? आजवर त्यानी इलाज केले नाहीत का?

'शुभदाताई, अनिल देशपांडे काही काळ मिलिटरीत कॅप्टन होते. आता आय. ए. एस. होऊन ते सिव्हिल सर्व्हिसमधे शिरलेत. दोघेही घरची संपन्न आहेत. अनेक डॉक्टराना त्यानी आपली तब्येत दाखविली आहे. अनेक उपचार, अनेक औषधे झाली. इथे आल्यानंतर माझे नाव कुणी त्याना सागितले म्हणून आवर्जून ऑफिसर्स क्लबवर माझी ओळख करून घेऊन त्यानी आपली केस माझ्यापुढे माडली. माझ्या हॉस्पिटलला त्यांची ही आजची तिसरी भेट. आधीच्या तपासणीचे सर्व रिपोर्ट पाहूनही मी माझ्या पद्धतीने दोघाचीही कसून तपासणी केली!'

'काय सल्ला दिला तुम्ही त्याना?'

'अजून सल्ला काहीच दिला नाही. पुन्हा चार-पाच दिवसानी बोलावले आहे. अशुभस्य कालहरणम्!' डॉक्टरांनी एक सुस्कारा सोडला.

'लीनाला मूल होणे शक्य नाही का डॉक्टर?'

'शुभदाताई, त्याना हे कसे सांगावे याचाच मी विचार करतोय.'

'इन्फन्टाइल युटेरस' ची केस आहे ही. गर्भाशयाची वाढच मुळी झालेली नाही. तेव्हा गर्भधारणा होणार कशी?'

डॉक्टराच्या उत्तराने शुभदा गंभीर झाली. डॉक्टरही क्षणभर आपल्या झुलत्या खुर्चीत विचारमग्न अवस्थेत डोळे मिटून, मागे रेलून बसले होते. खोलीत एक विलक्षण शांतता भरून राहिली होती. दोघाच्याही मनावर तिचे जणू दडपण आले होते. कुठून हा प्रश्न आपण डॉक्टराना विचारला असे शुभदाला झाले होते. खोलीचे दार ढकलून आत आलेल्या वॉर्डबॉयने त्या शांततेचा भंग केला. त्याने एक व्हिजिटिंग कार्ड डॉक्टरांच्या हाती दिले. डॉक्टरानी एक नजर त्याच्यावर फिरवली आणि वार्डबॉयला विचारले,

'अजून किती शिल्लक आहेत आजच्या ॲपॉइंटमेन्टस्?'

'पाच'

'मग उद्या चार वाजता यायला साग ह्या गृहस्थाना!'

'कार्ड घेऊन डॉक्टरापुढे लवून मागच्या पायाने वार्डबॉय खोलीबाहेर निघून गेला. डॉक्टर शुभदाला म्हणाले, 'चला आता तुमचे काम पुरे करू. कोणता सल्ला घ्यायला आलात तुम्ही?'

'डॉक्टर, मागे मी आपल्याजवळ ज्या गोष्टीबद्दल बोलले होते; त्यासंबंधीचे आपले मत आपण अजून सागितलेले नाही!'

'शुभदाताई, अशा गोष्टी दुसऱ्या पार्टनरच्या संमतीवाचून करता येत नाहीत. अशोकचा त्याला विरोध आहे हे तुम्हाला माहीत आहे.'

'पण आता त्यांची संमती मी मिळविली आहे, द्यायलाच लागली ती त्याला!'

'डॉक्टर हसले. म्हणाले, असहकार पुकारलात?'

खुदकन् हसून शुभदा म्हणाली, 'नाही. पटवून दिले त्याना!'

'पटलं?'

'न पटून काय करणार? डॉक्टर एखाद् दोन मुले अधिक झाली तरी त्याचे पालन-पोषण करण्याची कुवत आमच्यात नाही असे नाही; पण आजवर मी चागली सुशिक्षित असूनही राधा-वाढा, उष्टी काढा आणि मुलांचे पालनपोषण करा, ह्यातच माझ्या संसारी आयुष्याची बावीस-तेवीस वर्षे उलटून गेली. अशोकाचे ठीक आहे. त्याच्या व्यवसायात त्याचा दिवस कसा बुडतो हे त्याना समजतही नाही!'

'मग आता काय नोकरी करायचा अगर अशोकला त्याच्या व्यवसायात मदत करायचा विचार आहे का?

'ते काही ठरले नाही; पथ्य, बाळंतपणे सुटली, तर मला प्रकृतीचे स्वास्थ्यही लाभेल आणि मनात काही करायचे आले तर त्याला थोडीशी उसंतही मिळेल.

डॉक्टर आपल्या खुर्चीतून उठले. शेजारच्या तपासणीच्या खोलीकडे वळत तिला म्हणाले, 'या, निर्णयच घेऊन टाकू आज!'

¤

डॉक्टर शिरवाडकराकडून परत आल्यापासून शुभदाच्या डोक्यात एकच विचार रुंजी घालीत होता. 'लीनाच्या उपयोगी आपल्याला पडता येईल का? चार-दोन दिवस ह्या प्रश्नावर 'भवती न भवती' होऊन तिने डॉक्टर शिरवाडकरांचा सल्ला घ्यायचे ठरवले आणि त्याना फोन लावला.

'हॅलो, मला डॉक्टर शिरवाडकरांना जोडून द्या!' थोड्या वेळाने पलीकडून डॉक्टराचा परिचित आवाज येताच शुभदा म्हणाली, 'डॉक्टर, लीना देशपांडे तुमच्याकडे उद्या येणार आहे ना?'

पलीकडून डॉक्टराचा होकार आला असावा.

शुभदा म्हणाली, 'तुम्हाला आज थोडा वेळ आहे?'

'.........'

'मग मी आज चार वाजता तुम्हाला भेटायला येते.'

¤

त्या दिवशी संध्याकाळी चार वाजता डॉक्टरांच्या खोलीत शुभदा त्याच्यासमोर उभी राहिली तेव्हा त्यानी तिला विचारले,

'अशोकने फॉर्मवर सही केली वाटते? ऑपरेशनची तारीख मात्र जरा सवडीने ठरवायला हवी!'

डॉक्टराच्या समोरच्या खुर्चीत बसत शुभदा म्हणाली, 'डॉक्टर, ऑपरेशनची तारीख ठरवायला मी आलेली नाही! मी आज एक वेगळाच प्रश्न घेऊन आले आहे. उद्या तुम्ही लीनाला काय सागणार आहात?'

'आय ॲम सॉरी! यापरते दुसरे काय सागणार?'

'त्याचसंबंधी बोलायचंय मला डॉक्टर. माझी टयुबक्टमी करण्याऐवजी माझा युटेरसच काढून तो लीनाला बसविता नाही का येणार?'

शुभदाचा प्रश्न ऐकून डॉक्टर स्तिमित झाले होते. क्षणभर विचार करून ते म्हणाले, 'तुम्ही द्यायला तयार आहात?'

'देता येईल?'

'प्रश्न कठीण होता. आजवर डोळ्याचे, किडनीचे, अगदी हृदयाचेही ट्रॅन्सप्लॅन्टेशन करण्याचे प्रयोग देशात आणि विदेशात झालेले डॉक्टरांनी ऐकले होते; पण 'यूटेरस ट्रॅन्सप्लॅन्टेशन' ही कल्पना ना कोणी ऐकली होती, ना कोणाच्या मनात आली होती. डॉक्टराच्या मनातला संशोधक प्रयोगशील डॉक्टर शुभदाने जागा केला होता.

खरंच हे करता येणं शक्य आहे का? विचार करायला हवा. अनेक ग्रंथ धांडोळायला हवेत. आपल्या व्यवसायातील जाणत्यांनी केलेली प्रगती विचारात घ्यायला हवी. प्रयत्न करून पाहायला काय हरकत आहे?

'खरच देता येईल डॉक्टर?' शुभदाने डॉक्टरांच्या विचारसमाधीचा भंग केला.

'शुभदाताई, तुम्ही म्हणता ते शक्य झाले तर वैद्यक शल्यशास्त्र तुमचे कायमचे उतराई होईल इतकी महत्त्वाची कल्पना तुम्ही माझ्यापुढे मांडली आहे यात यश आले तर तुमच्या मैत्रिणीचेच जीवन सफल होईल असे नाही तर वैद्यक शल्य-शास्त्राचेही पाऊल ब्रह्मदेवाच्या दिशेने पुढे पडेल; पण यावर विचार करायला हवा. कारण कोणीही कधीही न केलेली ही शल्यक्रिया करण्यात धोका आहे; तरी पण मी तुमच्या कल्पनेवर विचार जरूर करीन!'

'पण डॉक्टर, लीनाला व अनिलला ह्यातले काही कळता कामा नये. अशोकला मी विश्वासात घेईन.'

'ह्या डिटेलस्‌चा नंतर विचार करू. युटेरस ट्रॅन्सप्लॅन्टेशन करता येईल असे ठरले तर तो प्रश्न येईल. मात्र तुमच्या मैत्रिणीला उद्या अंतिम नकार देण्याचा माझा विचार मी बदलला आहे!'

'थॅंक्यू डॉक्टर! खूप वर्षांत आम्ही भेटलो नसलो तरी लीना माझी कॉलेजमधील जिवश्च कंठश्च मैत्रीण आहे. दोघींचे स्वभाव भिन्न होते आवडीनिवडी भिन्न होत्या. छंदही वेगळे होते. तरीपण जिवाभावाच्या मैत्रिणी होतो. ती अनेक खेळ खेळायची. मी टेनिसकोर्टावर अगर बॅडमिंग्टन कोर्टावर होणाऱ्या तिच्या विजेसारख्या हालचाली टिपीत तासन्‌तास बसायची. ती खेळाडू म्हणूनच जन्माला आली होती. ती खेळत असता तिचे कपडे, पर्स, सायकल सांभाळीत बसण्यातच मला आनंद वाटायचा! मी बी. ए. च्या परीक्षेला बसले आणि माझे लग्न झाले. अशोकबरोबर मी या गावी आले. त्यानंतर गेल्या वीस बावीस वर्षात लीना मला परवा दिसली, ओझरतीच; पण मनात तिच्या सहवासातील गोड क्षणाच्या आठवणीचे मोहोळ त्या दर्शनाने उठवले. तिचे शल्य तुम्ही मला सांगितलेत आणि माझ्या मनात विचाराचे काहूर उठले. बाल गर्भाशय म्हणून माझ्या लीनाला मूल नाही, आणि मी माझ्या सुदृढ गर्भाशयाची ट्युबक्टमी करून तो निरुपयोगी करायला निघाले आहे. मग त्याचा उपयोग माझ्या लीनाला का करू देऊ नये? या विचारातून मी माझी जगावेगळी कल्पना तुमच्यापुढे मांडली डॉक्टर, तुमची सारी तपश्चर्या पणाला लावा; पण माझ्या लीनाला मूल होईलसे करा!'

तिचा उतावळा आवेग डॉक्टर कौतुकाने पाहात होते. म्हणाले, 'शुभदाताई, मी विचार करतो. अभ्यास करतो. तुमची कल्पना प्रत्यक्षात उतरविणे शक्य दिसले, तर मी प्रयत्नाची पराकाष्ठा करीन! एक प्रजननशास्त्राचा विद्यार्थी म्हणून माझा त्यात स्वार्थ आहेच!'

¤

दुसऱ्या दिवशी अनिल आणि लीना ही जोडी डॉक्टरांच्या खोलीत जेव्हा हजर झाली तेव्हा डॉक्टर एक जाडजूड ग्रंथ वाचण्यात गढून गेलेले त्यांना आढळले. त्यांच्या खोलीबाहेर आज पेशंटसची गर्दी दिसत नव्हती. त्यांचे असिस्टंट डॉक्टर नेने, आज त्यांचे पेशंटस् तपाशीत होते. फक्त अनिल आणि लीना आल्यावर त्याना आपल्या खोलीत पाठवण्याचा आदेश त्यांनी नेहमीच्या वॉर्डबॉयला देऊन ठेवला होता. अनिल आणि लीना त्यांच्यापुढे येऊन उभी राहिली तरी त्यांच्या वाचनसमाधीचा भंग झाला नाही. थोडा वेळ वाट पाहून अनिल देशपांडे यांनी 'गुड आफ्टरनून डॉक्टर!' असे म्हणत डॉक्टरांचे लक्ष आपल्याकडे वेधविले. तेव्हा पुस्तक मिटीत त्यांच्याकडे पाहून डॉक्टर म्हणाले, 'अरे, आपण केव्हा आलात? सॉरी हं आपण आत आल्याचे माझ्या लक्षातच आले नाही. बसा ना!'

लीनाकरिता एक खुर्ची मागे सरकवीत व दुसरी सरकवून तिच्यावर बसत अनिल म्हणाला, 'डॉक्टर, तुमच्या वाचनात व्यत्यय आणला म्हणून आम्हीच तुमची माफी मागायला हवी!'

'तसे नाही; पण मी तुमच्याच प्रॉब्लेमवर संदर्भ चाळीत होतो.'

डॉक्टरांनीच प्रश्नाला हात घातल्यामुळे अनिलला बरे वाटले. त्याने लगेच डॉक्टरांना विचारले, 'मग काय निर्णय आपला?'

'लीनाताईंना मूल होणे अशक्य कोटीतले आहे, असे मला वाटत नाही. आय से धिस इन्स्पाइट ऑफ युवर अर्लिअर रिपोर्टस्.'

डॉक्टराचे वाक्य ऐकून लीनाचा चेहरा फुलला. ती चटकन् म्हणाली, 'तुम्हाला खरंच असे वाटते? या वयातही मी आई होऊ शकेन?'

अनिल लीनाच्या खांद्यावर थोपटीत म्हणाला, 'बेअर इट् विथ पेशन्स्, लीना! डॉक्टर, अजूनपर्यंत अनेक ठिकाणी नकार घेऊन त्याची सवय झाली आहे आम्हाला. उपचार म्हणून वेडी आशा लीनाला दाखवलीत तर निराशा सहन करण्याची तिला आता ताकद उरली नाहीए. अगदी लहानपणापासून अनेक मैदानी खेळ खेळताना आणि विशेषत: टेनिसमध्ये कौशल्य मिळविताना तिच्या गर्भाशयाने गर्भधारणेची ताकदच गमावली आहे, हेही आम्हाला ठाऊक आहे. मी परखडपणे बोलतो त्यावद्दल क्षमा करा. पण एटिकेट म्हणूनही गुळमुळीत उत्तर देऊ नका!'

डॉक्टर अनिलच्या या सरबत्तीने स्तिमित झाले. म्हणाले, 'कलेक्टरसाहेब, मी एक जबाबदार डॉक्टर आहे. मला गुळमुळीत विधाने करायची सवय नाही; अशक्य असेल ते शक्य करायला मी ब्रह्मदेव नाही. पण शक्यतेची एकसहस्राश टक्के खात्री असेल तर प्रयत्नाची शिकस्त करणारा एक संशोधक शल्यविशारद मी आहे. तुम्ही म्हणाला ती लीलाताईंच्या गर्भाशयाची स्थिती मी पाहिली आहे. सर्वसामान्यपणे अशा स्थितीत गर्भधारणा अशक्य आहे, हेही मला माहीत आहे; पण ज्या विश्वासाने तुम्ही माझ्याकडे आलात, तो विचारात घेऊन माझा अभ्यास, माझे ज्ञान, माझी प्रयोगशीलता शल्यक्रियेतील निपुणता आणि तुमचे नशीब पणाला लावून मी लीनाताईंच्या बाबतीत काही प्रयोग करायचे ठरवितो आहे. त्याला यश आले तर अनेकांना जे अशक्य वाटले ते शक्य कोटीत आणण्याचे यशाचे माप माझ्या पदरात पडेल! पण त्यासाठी तुम्हा उभयताच्या सहकार्याची मला अपेक्षा आहे. अनिल, त्या अभ्यासाला मी सुरुवात केली आहे. त्याचेच द्योतक आजपासून सारे पेशन्ट्स् आणि हॉस्पिटलची सारी जबाबदारी डॉक्टर नेने त्यांच्याकडे सोपविली

आहे !' डॉक्टर थांबले.

अनिल आणि लीना चकित होऊन डॉक्टरांच्या तपस्वी चेहऱ्याभोवतालचे आत्मविश्वासाचे वलय पाहात राहिली. अनिल म्हणाला, 'सॉरी डॉक्टर, तुम्हाला दुखविण्याचा माझा हेतू नव्हता.'

'आय अंडरस्टॅन्ड् बट प्लीज, ट्राय टु अंडरस्टॅन्ड मी. तुम्हाला काही दिवस वाट पहावी लागेल. माझा विचार पक्का झाला की मीच तुम्हाला माझ्याकडे बोलावून घेईन !'

¤

हॉस्पिटलमधून निघाल्यानंतर अनिलने गाडी आपल्या बंगल्याकडे वळविली. लीनाला घरी सोडून ऑफिसमधील हाती असलेले काम पुरे करण्यासाठी परत आपल्या कार्यालयाकडे जायचा त्याचा विचार होता; पण बंगल्याशी गाडी येताच लीना म्हणाली,

'ऑफिसात जाणे अगदी आवश्यकच आहे का ?'

'अनिलने गाडीचा वेग कमी करीत विचारले, 'का ? जाऊ नको ?'

लीनाने मानेनेच 'नको' असे सुचवले. अशा वेळी लाडिकपणे मान हलवून आपले गोबरे गाल फुगवायची लीनाची सवय अनिलला नेहमीच मोह पाडायची. त्याने मुकाट्याने हॉर्न देत एक डावे वळण घेऊन गाडी बंगल्याच्या आवारात घेतली आणि पोर्चमध्ये नेऊन उभी केली. शिपाई पुढे धावला. त्याने अदबीने लीनाच्या बाजूचा दरवाजा उघडला. गाडीचा हॉर्न ऐकून गॅरेजमधला शोफरही पुढे आला होता. त्याच्या अंगावर गाडीच्या चाव्या टाकीत 'गाडी गराजमे रख दो !' अशी त्याला आज्ञा करीत अनिल पटकन लीनाच्या बाजूला आला आणि दोघानी बंगल्याच्या पायऱ्या चटचट चढून लीनाच्या बेडरूममध्ये प्रवेश केला.

'वेडाबाई, आज हा काय नसता हट्ट ?'

'वेडाबाई नसता हट्ट नाही करणार तर कोण करणार ?'

'अस्स', म्हणत अनिलने आपल्या कार्यालयात आपल्या चिटणिसाला फोन लावला. 'हॅलो, बर्वे का ? मी अनिल बोलतोय. मी आता कार्यालयात परत येत नाही. काही महत्त्वाचे कागद असलेच तर सध्याकाळी दफ्तर घरी पाठवून द्या.'

त्याने फोन बंद केला. टायची गाठ सैल करीत त्याने बूटही उतरविले आणि टीपॉयवर पाय पसरवीत खोलीतल्या सोफ्यावर तो आरामात बसला. तेवढ्यात नोकराने लेमन ज्यूसचा जार आणि ग्लासेस् पलीकडच्या टेबलावर मांडले. अनिल उठला. लीनापुढे एक ग्लास करीत म्हणाला, 'वेडाबाई घ्या' आणि तिच्या डोळ्यात पाहत त्याने विचारले, 'बोला की बाईसाहेब काही तरी नुसते गप्पच बसून राहायचे असेल तर संध्याकाळच्या ऐवजी कामाचे दफ्तर लवकरच घरी मागवून घेतो मी.'

'काही नको आणि आज कसलंही दफ्तर घरी पाठवू नका असा मी फोन बर्व्यांना करणार आहे.'

'अग पण का ?'

'अनिल, तुझी ही घरीदारी चालणारी कारकुनी मला मुळीच आवडत नाही, तुला ठाऊक आहे. आज मला तुझ्या-माझ्यात कुणि कुणि यायला नकोय.'

'गेल्या सोळा सतरा वर्षांत तुझ्यामाझ्यात कोणी आलंय का ? अशी काय करतेस वेडयासारखी ?'

'अनिल, डॉक्टर शिरवाडकर म्हणाले त्यात काही तथ्य आहे असे तुला वाटते का ?'

'हे बघ लीना, तू पेशन्स ठेवला पाहिजे. डॉक्टर शिरवाडकराची कीर्ती ऐकूनच आपण त्यांच्याकडे गेलो आहोत. त्यानीही इतराप्रमाणेच निदान केले आहे; पण हा प्रयोगशील माणूस काही प्रयोग करू म्हणतो आहे. यशाची खात्री नाही; पण अंधुक शक्यता आहे असे आपल्याला त्यानी सांगितलंय्. आपण एवढंच ध्यानी ठेवून आपल्याकडून सहकार्य करायचे; पण याहून वेडी स्वप्ने मनात फुलवायची नाहीत. वेड्या आशा मनात वागवायच्या नाहीत जरा कोणी आशा दाखविली तरी खुळ्यासारखी हुरळून जातेस तू. दोन वर्षांपूर्वी अमरावतीला असताना उत्तरेकडल्या कोण्या ज्योतिषाने तुला वर्षभरात पुत्रमुख दिसेल असे मिशीला हात लावून सांगितले तेव्हा डॉक्टरी निदाने माहिती असूनही तू त्याच्या सांगण्यानुसार हजारो रुपये उधळलेस, व्रतवैकल्ये आणि काही दैवी तोडगे करायला सिद्ध झालीस ! आपल्यासारख्या सुशिक्षिताना हे शोभत नाही.'

'पण मला हे वांझपण खायला उठते हो ! तुमच्याशी लग्न करून मी तुमचा संसार उजाड केला. पुन्हा पुन्हा सांगूनही तुम्ही माझे ऐकले नाही.' लीना स्फुंदत म्हणाली.

तिला हळुवारपणे कुरवाळीत अनिल म्हणाला, 'वेडाबाई, अग, माझे तुझ्यावर किती प्रेम आहे तुला माहीत आहे. माझ्या वंशाचा दिवा लागावा म्हणून मी दुसरे लग्न करावे असे तू पुन्हापुन्हाच काय पण लक्ष वेळा जरी सांगितलेस, तरी ते मला मान्य नाही हे तुला ठाऊक आहे. मला माझ्या लीनालाच मूल झालेले हवे आहे. दुसऱ्या कोण्याही स्त्रीच्या ठिकाणी झालेले मूल मला माझे वाटणारच नाही. गेली कित्येक वर्षे तू हे वेड डोक्यात घेऊन बसली आहेस. अग, संसार सुखाचा व्हायचा तर त्यासाठी मूलच व्हायला हवे का ? आपल्याला काय कमी आहे ? बंगला आहे, गाडी आहे, नोकरचाकर आहेत. मौज-मजा करायला हाताशी हवा तेवढा पैसा आहे. सकाळ-संध्याकाळ आपण मन मानेल तेवढे खेळतो. म्हणू तिथे फिरायला जातो. म्हणू त्या सहली काढू शकतो. हा आपला देशच काय पण किती तरी परदेशही आपण पायातळी घातले आहेत. संसारात आणखी काय हवे असते लीना ?'

त्याच्या कुशीत डोके लपवीत लीना म्हणाली, 'खरेच काऽऽऽही नको असते; पण मी वेडी उगाचच स्वत. दुःखी होते आणि तुलाही सुख देत नाही.'

'असे बोलू नको लीना. तुझ्या सहवासात मी फार सुखी आहे.'

¤

शुभदाने हॉस्पिटलवर अनेकदा फोन करून डॉक्टर शिरवाडकराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; पण कधी ते मुबईला गेले आहेत असे उत्तर मिळायचे तर कधी दिल्ली-कलकत्त्याकडे रवाना झाल्याचे पलीकडून उत्तर मिळायचे अनेकदा तर टेलिफोनऑपरेटर म्हणायची, 'शुभदाताई, ते इथे आहेत; पण त्याना कुणीही डिस्टर्ब करू नये अशी त्यांची आज्ञा आहे !' शुभदाला कळेना, डॉक्टरानी हे काय चालवलय ? एक दिवस धैर्य करून शुभदा हॉस्पिटलवर हजर झाली. डॉक्टर शिरवाडकर भेटू शकले

नाहीत; पण डॉक्टर नेने म्हणाले, 'मला करता येण्यासारखे असेल तर सागा; पण डॉक्टर शिरवाडकर सध्या काही अभ्यासात गढले आहेत. कोणालाच भेटत नाहीत. कलेक्टरसाहेबांच्या बंगल्यावरूनही अनेकदा फोन आले होते. मी एक दोनदा विचारले तेव्हा म्हणाले, 'वेळ आली की सागतो. तुमच्या सहकार्याशिवाय मला काहीच करता येणार नाही. बट् लेट मी गेट कन्व्हिन्स्ड् मायसेल्फ '

शुभदाला यातून फक्त एवढाच अर्थबोध झाला की आपण सांगितलेली कल्पना डॉक्टराच्या मनात चांगलीच रुजली आहे; पण ती डॉक्टर नेन्यांजवळ काहीच बोलली नाही.

¤

त्या दिवशी संध्याकाळी शुभदाला डॉक्टर शिरवाडकरांचा तातडीचा निरोप आला. निरोप घेऊन डॉक्टराचा शोफरच गाडी घेऊन आला होता. डॉक्टरानी तिला हॉस्पिटल-ऐवजी आपल्या बंगल्यावरच बोलावले होते. तिला घेऊन येण्याचीच आज्ञा होती. आपला जामानिमा करून आपण डॉटराकडे जात असल्याचा फोन तिने अशोकला केला. त्याला काम आटोपल्यावर डॉक्टरांच्या बंगल्यावर यायला सांगितले आणि घराची व्यवस्था स्वैपाकिणीवर सोपवून ती गाडीत बसली. गाडी बंगल्याच्या गेटमधून आत शिरली आणि पोर्चमध्ये उभी राहिली. व्हरांड्यात येर-झाऱ्या घालीत डॉक्टर शुभदाची वाटच पहात होते. शोफरने दार उघडून शुभदा गाडीबाहेर पडताच त्यांनी तिचे आनंदाने स्वागत केले. म्हणाले, 'या, या, गेल्या तीन महिन्यात तुमचे अनेकदा फोन आले तरी तुमची भेट घेऊ शकलो नाही म्हणून रागावला असाल तुम्ही माझ्यावर; पण माझा इलाज नव्हता! चला, स्टडीमध्येच सारे स्पष्टीकरण करतो.'

त्यांच्यामागून शुभदा त्यांच्या स्टडीमध्ये शिरली. सगळ्या भिंती पुस्तकानी खच्चून भरलेल्या रॅक्सनी भरून गेल्या होत्या. मधल्या लंबगोलाकार टेबलावरही अनेक पुस्तके, अनेक कागद आणि टिपणे विखरून पडली होती. आपल्या खुर्चीत रेलून बसत टेबला-समोरच्या दोन खुर्च्यांपैकी एकीवर शुभदाला बसायची खूण करीत डॉक्टर म्हणाले, गेल्या तीन महिन्यातील अनेक दिवस आणि अनेक रात्री मी एकटा या स्टडीमध्ये नाही तर हॉस्पिटलच्या लॅबोरेटरीमध्ये काढल्या आहेत! या तीन महिन्यात किती रात्री मी झोपलो नाही अगर किती रात्री अंथरुणावर पडलो तरी झोप आली नाही हे सांगता यायचे नाही! साऱ्या भेटी, हॉस्पिटलचे काम बंद ठेवले होते. ठाऊक आहे का ते ? '

'आय ॲम सॉरी. मीच तुम्हाला या भरीला पाडले डॉक्टर !'

'असे नका म्हणू. तुमच्या कल्पनेने मला भारून टाकले आणि मी तिची तड लावायचे ठरविले. अफाट वाचन केले. अभ्यासपूर्वक काही प्रयोग केले. आज मी किती आनंदात आहे हे मला सांगता येणार नाही !'

'डॉक्टर, तुमच्या चेहऱ्यावरून तुम्हाला तुमच्या तपश्चर्येचे यश दिसायला लागले आहे असे वाटते. खरंच माझी जगावेगळी कल्पना प्रत्यक्षात येऊ शकेल ?'

'माझ्या लीनाला मी तिचा हरवलेला आनंद परत देऊ शकेन ? '

'शुभदाताई, मी प्रयोग करून पहायचे ठरवले आहे हे नक्की! यशापयश त्या प्रभूच्या हाती !'

डॉक्टरांनी न कळत आपले दोन्ही हात वर केले. प्रयोगशील विज्ञाननिष्ठ तपस्वीही कोण्या न कळत्या अनंताच्या आधाराच्या श्रद्धेवरच शेवटी अवलंबून असतात हेच खरे!

'शुभदाने अधीरतेने विचारले,' मग केव्हा ठरवता ऑपरेशनची तारीख ? '

'पण अशोकरावांची संमती ? '

'मी त्याना विश्वासात घेतले आहे. एवढ्यात ते इथे येतील हवे तर त्यांना प्रत्यक्षच विचारा !'

'त्यांची जरुरी नाही शुभदाताई, तुम्हा उभयताच्या सहकार्यावरच माझी नजर आहे.'

एवढ्यात अशोकची गाडी बगल्याच्या आवारात शिरलेली दिसली. डॉक्टर खुर्चीतून उठत म्हणाले, 'अशोकना शंभर वर्षे आयुष्य आहे!'

शुभदा अशोकच्या स्वागतासाठी व्हरांड्या-कडे जायला निघाली तोच स्टडीचे दार ढकलून अशोक आत आलाही.

'या अशोकराव. आम्ही आत्ताच तुमची आठवण काढली होती '

'का बुवा ? तेच तर विचारायला मी इथवर आलो.'

'अशोक, डॉक्टरानी प्रयोग करण्याचा निर्णय घेतलाय.'

'इझिट ? काँग्रॅट्स् डॉक्टर ! दि होल कन्ट्री मस्ट बी प्राऊड ऑफ यू !'

'तुमचे अभिनंदन मी एवढ्यात स्वीकार-णार नाही· यश दिसतंय्; परंतु त्याच्या मार्गावर किती तरी 'इफ्स' 'अन्ड 'बट्स्' माझ्याकडे डोळे वटारून पाहाताहेत !'

'ते खरे; पण तुमच्या हाताला आजवर अपयश माहीत नाही, तुमचा हाही प्रयोग यशस्वी होईल, याची मला खात्री आहे ! '

'थँक्स प्रयोगाचा दिवस, तारीख आणि वेळ मी तुम्हाला आठ-पधरा दिवसात कळवितो.'

'पण डॉक्टर, लीनाला–' शुभदाने डॉक्टरांना आपल्या अटीची आठवण देण्याचा प्रयत्न केला.

'डोन्ट वरी. माझ्या ध्यानात आहे. त्या उभयतांना यातले काही समजणार नाही याची काळजी घेईन मी ! '

'मग निघू आम्ही ? '

'या !'

¤

डॉक्टर शिरवाडकरांच्या हॉस्पिटलमध्ये त्या दिवशी दोन ऑपरेशन-थिएटर्स सुसज्ज ठेवण्यात आली होती. एक पहिल्या मजल्या-वर आणि दुसरे तळमजल्यावर. प्रत्येक थिएटरशी संलग्न असलेल्या परिचारिका, सिस्टर्स, वॉर्डबॉईज, डॉक्टर्स अगदी पहाटे-पासून आपापल्या नेमून दिलेल्या कामाची जुळवाजुळव करण्यात गर्क होते. दोन्ही पेशन्टस आदल्या रात्रीच ॲडमिट झाले होते. एकाच वेळी दोन ऑपरेशन्सची तयारी का केली होती, याची डॉक्टर शिरवाडकर आणि डॉक्टर नेने यांच्याशिवाय कोणालाच कल्पना नव्हती. बरोबर सात वाजता शुभदाला स्ट्रेचरच्या ढकलगाडीवरून ऑपरेशन-थिए-टरमध्ये नेण्यात आले. ऑपरेशनटेबलावर तिला घेतल्यानंतर ॲनास्थेरिया देण्यापूर्वी डॉक्टर शिरवाडकरानी तिला विचारले,

"काय शुभदाताई, बरंय ना ?" रेडी ?

शुभदा हसली. तिने जणू आपली संमती व समाधान त्या हसण्याद्वारे व्यक्त केले. डॉक्टरानी अनास्थेटिस्टला खूण केली. जे इंजक्शनची सुई घेऊन तो पुढे झाला. तिच्या

उजव्या हाताच्या शिरेमध्ये सुई टोचण्यापूर्वी तो तिला म्हणाला,

'मॅडम, एक ते दहा अंक मोजा!'

सुई शिरेत शिरली. शुभदाने दुसरा अंक म्हटलाच नाही. डॉक्टर शिरवाडकर आणि डॉक्टर नेने त्वरित कामाला लागले. तिच्या ओटीपोटाला छेद देऊन त्यांनी त्वरित गर्भाशयाची पिशवी इतर विविध शिरानलिकापासून वेगळी केली आणि गर्भाशय, जवळच्या विशिष्ट द्रावण असलेल्या एका भाड्यात ठेवला. ऑपरेशन करून स्टिचिस घालण्याचे काम डॉक्टर नेने ह्याच्यावर सोपवून डॉक्टर शिरवाडकर तळमजल्यावरील ऑपरेशन-थिएटरमध्ये आले. तेथील मदतनीस डॉक्टरानी आधी मिळालेल्या सूचनांप्रमाणे लीनाला ऑपरेशन-थिएटरमध्ये आणून ऑपरेशन-टेबलावर तयार ठेवले होते. डॉक्टर शिरवाडकर आत येताच ऑपरेशन-थिएटरमधील झगझगीत दिवे पेटविले गेले. परिचारिका, डॉक्टर्स, सिस्टर सभोवताली आपापल्या जागी योग्य ती उपकरणे घेऊन उभे झाले. अनास्थेटिस्ट सिरिंज घेऊन तयार होता. डॉक्टरानी एकदा लीनाच्या चेहऱ्याकडे पाहिले. ती आनंदात दिसत होती. डॉक्टर तिला म्हणाले, "लीनाताई, तुमची प्रबळ इच्छा, माझे कौशल्य आणि त्या प्रभूची कृपा यावर भिस्त ठेवून मी हा प्रयोग करतो आहे. कीप अप युवर पेशन्स!'

लीना म्हणाली, 'मी कुठल्याही गोष्टीला तयार आहे डॉक्टर!' देव तुम्हाला आणि मला खचितच यश देईल, असा त्या हसण्याचा अर्थ होता. अनास्थेटिस्टला सूचना मिळाली. त्याची सुई लीनाच्या उजव्या हाताच्या शिरेमध्ये शिरली. लीनाची शुद्ध हरपली. डॉक्टराचे हात काम करू लागले. तिचा बालगर्भाशय इतर शिरा-नसापासून तोडून बाहेर काढण्यात आला. वरच्या ऑपरेशन थिएटरमधून आधीच तिथे पोहोचलेला नवा गर्भाशय योग्य त्या जागी आरोपित करून शिरा व नसा अगदी काळजीपूर्वक ठिकठिकाणी जोडायला दोन-अडीच तास लागले. निरनिराळ्या उपकरणानी काम करणाऱ्या डॉक्टराच्या कपाळावर घर्मबिंदू जमा झाले होते. गर्भाशय, ग्रीवा जोडून झाली आणि डॉक्टरांनी ऑपरेशन पूर्ण केले. रक्तस्राव बंद करणे, स्टिचिस घालून जखम बंद करणे इत्यादी गोष्टी होईस्तोवर तीन तास उलटले. डॉक्टरांच्या सूचनेप्रमाणे ऑपरेशन सुरू होताच टेबलाच्या दोन्ही बाजूनी रक्ताच्या व सलाइनच्या बाटल्या उलट्या लोंबायला लागल्या होत्या. ऑपरेशनच्या काळात त्यानी लीनाला शक्ती आणि रक्त पुरवले होते. जखम बंद करून डॉक्टरानी लीनाची नाडी तपासली.स्टेथसस्कोपने तिच्या हृदयाची धडधड त्यांना ऐकविली. पेशन्ट सुस्थितीत असलेला पाहून डॉक्टर आनंदले. पेशन्टला त्याच्या रूममध्ये नेण्याची सूचना करून आणि रक्त व सलाइन आणखी काही काळ चालू ठेवण्याची आज्ञा देऊन डॉक्टर थिएटरच्या बाहेर आले. आपल्या रूमकडे जाण्यापूर्वी त्यांची पावले शुभदाच्या खोलीकडे वळली. शुभदा आता शुद्धीवर आली होती. डॉक्टर खोलीत शिरताच त्याच्याकडे पाहून ती मलूल हसली. तिच्या चेहऱ्यावर दृग्गोचर झालेल्या प्रश्नाला जणू उत्तर देत डॉक्टर म्हणाले, 'सारे ठीक पार पडले. पेशन्ट सुस्थितीत आहे. तुमचे ठीक आहे ना?' डॉक्टरांच्या शब्दांनी शुभदा सुखावली. तिच्या डोळ्यांतूनच ते सुख आणि तिला झालेला आनंद ओसंडत होता. अटेन्डंट नर्सला काही सूचना करून डॉक्टर शुभदाला म्हणाले, 'अच्छा आराम करा आता!' आणि डॉक्टर आपल्या रूमकडे निघून गेले.

¤

डॉक्टरांनी शुभदाला पंधरा दिवसांनी डिस्चार्ज दिला. लीनाला मात्र त्यानी दोन महिने ऑब्झर्वेशनसाठी ठेवले होते. तिचा दुसरा मेन्स्टुरेशन पीरयड अगदी बरोबर अठ्ठावीस दिवसानी आला. तेव्हा डॉक्टरांना 'जितम् मया'चा आनंद झाला. त्या दिवशी संध्याकाळी नेहमीप्रमाणे अनिल लीनाला भेटायला आला. तेव्हा डॉक्टर त्याना म्हणाले,

'अनिल, तुमच्या दोघामधले विरहाचे कमलाचे पान मी आता दूर करणार आहे.'

'डॉक्टर, माझ्यासारख्या रेव्हिन्यूतल्या रुक्ष माणसाला तुमचे काव्य समजले नाही.'

'लीनाताईंना मी उद्या डिस्चार्ज देणार आहे. या बातमीने तर तुमच्या जीवनात काव्य फुलेल?'

'अच्छा! उद्या सकाळी किती वाजता येऊ? गेले दोन महिने घर नुसते खायला उठलंय!' अनिल अधीरतेने म्हणाला,

'आय अंडरस्टॅन्ड. दि पेशन्ट ईज ओके!' डॉक्टर मिस्किलपणे पुढे म्हणाले, 'फॉर ऑल परपझीस् आय मीन' आणि ते मोठ्याने हसले.

'डॉक्टर, चेष्टा करता आमची?' लीना लाजून म्हणाली.

¤

लीनाला डिस्चार्ज देऊन दोन महिने उलटले. त्या अवधीत लीना दोन-तीन वेळा चेकअप्साठी येऊन गेली होती. तिची प्रगती समाधानकारक होती. त्यामुळे त्या दिवशी संध्याकाळी डॉक्टरांच्या टेबलावरचा फोन घणघणला आणि ऑपरेटरने कलेक्टर अनिल देशपांडे बोलताहेत असे सांगितले. तेव्हा डॉक्टर तपाशीत असलेल्या पेशन्टला सोडून फोनजवळ आले. फोनमध्ये अनिलचा आवाज घाबरल्यासारखा येत होता.

'होय मी डॉक्टर शिरवाडकरच बोलतो आहे. व्हाटस् द मॅटर अनिल?'

'.................'

'इझिट? देन ब्रिंग हर हियर.'

'.................'

'बर, मी एक अर्ध्या तासात येतो.'

अपॉइंटमेंट असलेल्या एक-दोन पेशन्टस्ची तपासणी संपवून डॉक्टर अनिलच्या बंगल्यावर पोचले तेव्हा अनिल देशपांडे त्यांची चातकासारखी वाट पाहात होता. लीनाच्या बेडरूमपासून व्हराड्यापर्यंत त्याच्या आतबाहेर फेऱ्या चालल्या होत्या. डॉक्टर गाडीतून उतरून बंगल्याच्या पायऱ्या चढले तेव्हा त्याचे हात धरून अनिल म्हणाला,

'किती उशीर केलात डॉक्टर? लीना इज व्हेरी अनकम्फर्टेबल!'

त्याच्या खांद्यावर थोपटीत डॉक्टर म्हणाले, 'चला, पाहू या!'

लीना पलंगावर श्रांतपणे पहुडली होती. घरातली एक नोकर स्त्री तिचे डोके चेपीत बसली होती. डॉक्टर येताच ती उठून उभी राहिली आणि बाहेर निघून गेली. तिच्या पलंगाशेजारी एक खुर्ची ओढून त्यावर बसत डॉक्टर म्हणाले, 'काय लीनाताई, अनिलची का घालमेल उडवून दिलीत?'

'तुम्हाला आपली चेष्टा वाटते डॉक्टर! पण गेल्या चार-पाच दिवसात हिच्या पोटात काही ठरतच नाही. आज तर भारीच एक्झॉस्ट झाली आहे!'

' मग मला ह्याचापूर्वीच का नाही कळवलेत? तिचे ओटीपोट चाचपीत डॉक्टर पुढे म्हणाले, 'म्हणजे यापूर्वीच तुम्हांला आनंदाची बातमी सांगितली असती! अनिल, यू आर सून गोइंग टु बी ए फादर अॅन्ड मायसेल्फ दि ग्रॅन्डफादर!' लीना मलूल हसली.

अनिलकडून परतताना डॉक्टर शिरवाडकरांनी आपली गाडी शुभदाच्या बंगल्यावरून घेऊन तिलाही ती गोड बातमी सांगितली. आपल्या आनंदाच्या भागीदाराला सांगितल्यावाचून त्यांना राहावले नाही! ☐

कलेक्टरसाहेबांच्या बंगल्यावर आणि बागेत दिवाळीची रोषणाई फुलली होती. तो दिवस अनिल व लीनाच्या आयुष्यातील उत्कट आनंदाचा होता. लीनाला झालेल्या मुलाच्या बारशाचा तो दिवस होता. गावातील डॉक्टर, वकील, व्यापारी इत्यादी प्रतिष्ठित मंडळींना निमंत्रण होते. बागेतल्या हिरवळीवर निमंत्रितांसाठी टेबल्स् टाकली होती. बरोब्बर पाच वाजता डॉक्टरांची गाडी बंगल्याच्या आवारात शिरली. डॉक्टरांच्या गाडीपाठोपाठ अशोक आणि शुभदाही आपल्या गाडीने तिथे येऊन ठेपली. अनिल डॉक्टरांचे स्वागत करण्यासाठी पुढे धावला. ते स्वागत स्वीकारीत आणि अशोक-शुभदाचा अनिलशी परिचय करून देत डॉक्टर म्हणाले,

'चला प्रथम लीनाताईंना भेटू या!'

लीनाच्या खोलीत शिरताना अशोक-शुभदाला खोलीबाहेर थांबवून डॉक्टर अनिलसह खोलीत शिरले, तेव्हा लीनाच्या सभोवतालचा सुहासिनींचा थवा भिरोऱ्यासारखा पांगला.

'काय लीनाताई, काय म्हणताहेत बाळराजे?'

'काय म्हणणार? आजोबांनी यायला एवढा उशीर का केला, असं म्हणताहेत!'

'लवकरच येणार होतो पण तुम्हाला आणि बाळराजांना एक प्रेझेंट आणायचे होते म्हणून मला उशीर झाला.'

'आम्हाला तर तुम्ही प्रेझेंट दिलेच आहे. आता आम्हीच तुम्हाला प्रेझेंट द्यायचे आहे आज!' अनिल म्हणाला.

'तुम्हाला प्रेझेन्ट मिळाले यात मला माझे प्रेझेंट मिळालेच आहे. आज मी लीनाला वेगळेच प्रेझेंट देणार आहे.' असे म्हणत डॉक्टरांनी अशोक व शुभदाला आत येण्याची खूण केली. ते आत येताच डॉक्टर लीनाला म्हणाले, 'लीनाताई, हे ते प्रेझेंट!'

'शुभदा ऽऽऽ' असे म्हणत लीना उठली आणि शुभदाला कडकडून मिठी मारीत म्हणाली, 'कुठे नाहीशी झाली होतीस ग इतके वर्ष? ह्याच गावात होतीस मग गेल्या वर्षा-दीड वर्षात भेटलीस कशी नाही कुठं?'

'ह्या दिवसाची वाट पहात थांबल्या होत्या त्या लीनाताई! तुम्हाला हा आनंदाचा दिवस दाखवण्यात माझ्यापेक्षाही ह्यांनी केलेले एक आगळे दान अती मोलाचे आहे!'

'डॉक्टर ऽऽऽ' शुभदा म्हणाली.

'नाही शुभदाताई. ज्याचे श्रेय त्याला दिलेच पाहिजे! लीनाताई, आवडले ना हे प्रेझेंट? आईला मैत्रीण आणि मावशी मिळाली. चला अशोक, अनिल आता आपण बाहेरच्या औपचारिक कार्यक्रमाकडे वळू या!' ☐

---

# पुस्तके

## दीनार

### शेवटला सलाम करीत करीत इथले नागरिक खुशीत सारे....

दोन वर्ष तुटल्यानंतर
प्रथमच भारतात आलो तेव्हा
स्वागताने दडपून गेलो
जेवणं, पार्ट्या, मौज–मजा–

नंतर जाणवलं कुठे तरी बिनसलंय
भेटवस्तूंच्या समप्रमाणात
आपुलकीचं नातं बदललंय
काही जुळलंय, काही टिकलंय, काही तुटलंय
मन माझं कुरतडत चाललंय.'

मानवी जीवनात येणाऱ्या अनेक अनुभवांपैकी हा एक अनुभव. जातीगोती, व्यक्तीव्यक्तींमधले संबंध यामधील तकलुपीपणा असा सौम्यपणे मांडणारे कवी निरंजन उजगरे आपल्या 'दीनार' या कवितासंग्रहात जीवनातले असे अनेक पदर उलगडवून दाखवतात.

आखातातील अरब देशातील भारतीयांचा अनुभव म्हणजे दीनार. आपल्या अनुभवविश्वापलीकडचा हा अनुभव वेगळा आणि उत्कट आहे, काव्यात्मक आहे.

काव्यसंग्रहाच्या सुरुवातीसच कवीने म्हटले आहे की, 'आखाताातीतील अरबदेशात नोकरीसाठी गेलेल्या हजारो भारतीयांच्या आयुष्याची, भावविश्वाची मला जाणवलेली आणि मी अनुभवलेली स्पंदने म्हणजे 'दीनार' असं असलं तरी दीनारमधील अनुभव–एका व्यक्तीचा अनुभव–म्हणून साकार होत नाही तर एक व्यापक आयडें-

टिटी घेऊन साकार होतो. परदेशात असलेल्या व्यक्तीला आपल्या घराची, संस्काराची, नात्यागोत्याची झालेली ही नुसती आठवण नाही तर तो एक काव्यात्म अनुभव आहे.

मित्राबरोबर भारतात पाठवलेल्या
बंद पाकिटातील निरोप :
' मधुचंद्राचे रंगीत फोटो
तुला सोबत पाठवीत आहे,
वर्षभर जडव चित्रावर डोळे — — '

हा निरोप खूप बोलका आहे, तसाच तो उत्कटतेने भारावलेलाही आहे. आखाती देशातल्या आपल्या बांधवांना उद्देशून म्हणताना कवी लिहितो–

' इथे माझ्या देशातले लोक
चंदेरी पक्ष्यावर स्वार होऊन
मैलांचे शेकडो ढग ओलांडून येतात;
वर्तमानाचे पंख काळ्या दाट तेलात बुडवून
भविष्य कमावतात ! '

असे अनुभव व्यक्त करताना श्री. उजगरे यांनी जो रूपबंध निवडला आहे तो कवितेची काव्यात्मकता अधिक नेमकेपणे मांडतो. मुक्तछंदात्मक कवितांचा हा रूपबंध अनुभवाला अधिक सखोल करतो. या सर्वच कविता शब्दांनी छोट्या आहेत. आशयातला नेमकेपणा या ' छोटेपणा 'मुळे अधिक जाणवतो आणि यातच या कवितेचा वेगळेपणा आहे.

अरब देशातील संस्कृतीचे संदर्भ श्री. उजगरे या कवितांमधून देताना दिसतात. तिथल्या व्यक्ती, त्यांचे स्वभाव, तिथलं वातावरण यांचे तुटक उल्लेख या कवितेमधून येतात.

रस्त्यामधून वाहणाऱ्या
वाळूच्या लाटांमधून
संध्याकाळची बाग पसरत जाते
आम्हा उतारूंना रस्त्यावर सोडून
मशिदीच्या दिशेने
टॅक्सी सुसाट वाहू लागते...
किंवा
' राहायला घरे पोटभर खाणे,
(सप-लढ्यास बंदी इथे
खाजगी जीवन सुरक्षित आहे.)
(जाहीर सभांना बंदी इथे)
(प्रकाशनांस बंदी इथे)
शेखला सलाम करीत-करीत
इथले नागरिक खुशीत सारे '

—यासारख्या कवितांमधून येणारे संदर्भ तिथल्या जीवनाचे पदर उलगडून दाखवतात.

इथं आपल्याला जगाची चकचकीत बाजारपेठ अनुभवायला मिळते. भिकाऱ्यांहून लाचार होणारे आमच्यातलेच काही इथे भेटतात तर तिथे जाऊन देहविक्रय करून नवऱ्याला भरपूर पैसे पाठवणारी बाईही दिसते. अशा किती तरी ओळखीच्या व्यक्तिरेखांचे दर्शन इथं होतं. या सगळ्यामधून जीवनाच्या क्षणभंगुरतेची आणि मखोलतेची जाणीव कवी करून देतो.

या कवितेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिला शब्दांचा ' सोस ' नाही. आशयाच्या अभिव्यक्तीसाठी कवी आपला अनुभव प्रतिमा आणि रूपकांच्या गोंधळात अडकवत नाही तर जो अनुभव काव्यात्म आहे तो जसाच्या तसा मांडण्याचा ते प्रयत्न करतात. काही वेळा प्रतीके, प्रतिमा यांचा वापर श्री. उजगरे करतात; पण तरी तिथे केवळ ' सोस ' म्हणून त्या येत नाहीत.

या संग्रहात असलेल्या ६४ ही कवितांना एक अंतर्गत संगती आहे, त्यात कथा नाही; पण अनुभवाची एक सुसंगती आहे; ही सुसंगती कवितांच्या क्रमवारीत हरवलेली दिसते. ही क्रमवारी असती तर त्या प्रत्येक कवितेचे वेगळेपण टिकून राहिले असते आणि ह्या सर्वच कवितांचा मिळून एक अनुभव व्यापक पातळीवर साकार होण्यास मदत झाली असती असे वाटते.

या कवितांना शीर्षके नाहीत, त्या नुसत्या एका पाठोपाठ येत जातात, पण त्याचमुळे बहुधा त्यांच्यामधील सुसंगतीला वाचक साद घालत जातो.

हा सगळाच अनुभव वेगळा असला तरी उपरा नाही. त्यात आपलेपणाचा अंश आहे. कारण त्या अनुभवाला इथल्या मातीचा स्पर्श आहे, संदर्भ आहे.

' माझ्या हिचं
मागच्या महिन्यात पत्र आलं
जाईची फुलं ठेवलेलं
बबड्यानं रेघोट्या मारलेलं...
काल पुन्हा पत्र आलं
बबड्याचा ताप चढत जातो
बाबा–बाबा गुंगीत कण्हतो–
पुढील अक्षरांचे थेंब
मला वाचवत नाहीत ..'

ही कविता आणि अशा अनेक कवितांमधील संदर्भांमध्ये आपलं अस्तित्व असतं.

मराठी कवितेतल्या अनुभवातला तोच-तोचपणा दीनारमध्ये दिसत नाही. त्याच प्रतिमा, तीच प्रतीकं यांच्यामधून ही कविता बाहेर पडली आहे नवं आभाळ शोधण्यासाठी !

संग्रहाच्या प्रारंभीची एक ओळ अशी आहे–

भूतकाळातल्या धडपडणाऱ्या रस्त्याचा
एक निर्णायक रन–वे झाला
आणि......
हा दीनार म्हणजे–
वादळाच्या प्रचंड झोताने
रसरसून पेटते वाळवंटाची अजस्र भट्टी
धातू एकजीव होतो
तारवटलेल्या पेशींच्या मुशीतून
सापळ्याच्या साच्यात
दीनार ओतला जातो
सगळं थंडावताना
लख्ख दीनार तयार होतो.

यातून कवी आपलं मनोगत सांगतो आहे. हे नवं आभाळ फार मोठं असलं तरी त्यातलं जे पाहिलं ते टिपलं आणि टिपताना अनुभवाशी इमान राखलं यातच या कवितेचं यश !

**—मुकुंद संगोराम**

दीनार (काव्यसंग्रह)
वितरक : मौज प्रकाशन गृह
पृष्ठे ६४ : मूल्य ७ रुपये

फिनिक्स निवड

# डॉ. थॉमस यांची दोन पुस्तके

'The Medusa and the Snail' (More notes of a Biology watcher– Lewis Thomas ) हे पुस्तक डॉ. जॅकब ब्रोनोव्हस्कीच्या 'The Ascent of Man' या पुस्तकासारखे आहे. दोन्ही पुस्तकात मानवाच्या भवितव्याविषयी कमालीचा आत्मविश्वास आहे. दोन्ही पुस्तके वाचून झाल्यावर आपल्याला त्या आत्मविश्वासाचा संसर्ग लागतो व आपण Prophets of Doom कडे वरचष्मा लावून बघतो. दोन्ही पुस्तके विज्ञानावर आहेत; पण दोन्ही पुस्तकाचे प्रेझेंटेशन आर्टच्या पुस्तकासारखे आहे. दोन्ही पुस्तकांत अवघड विषय सोप्या व मनोरंजक भाषेत सांगितले आहेत. ज्याना 'The Ascent of Man' हे पुस्तक आवडले असेल त्यानी तर हे पुस्तक अवश्य वाचावे. श्री. ब्रोनोव्हस्कीच्या पुस्तकात पाश्चात्य मानवाविषयी थोडीशी वल्गना आहे हे मी त्याच्या पुस्तकाबद्दल लिहिताना सांगितले आहेच. हा दोष मात्र डॉ. थॉमसन यांच्या पुस्तकात नाही.

आमच्या ग्रंथालयात मी हे पुस्तक घेणार आहे. या पुस्तकाबद्दल मी जे 'माणूस' मध्ये लिहीत आहे ते काही प्रमाणात 'टाइम' या साप्ताहिकावरून आहे. 'टाइम' सारखे नॉनटेक्निकल, उत्तम नियतकालिक जगात नसेल! भूतकाळात 'टाइम'ने आपल्या दोषाविषयी पुष्कळ टीका केली आहे.ती टीका गैरलागूही आहे; पण मला इंग्रजी पुस्तकाबद्दल टाइममध्ये इतकी उत्कृष्ट माहिती मिळते की माझ्या पुस्तकाच्या आतल्या कात्रणासाठी मी टाइमला अग्रगण्य स्थान देतो. या पुस्तकाविषयी १४ मे १९७९ च्या टाइमच्या अंकामध्ये श्री. पॉल ग्रे यानी या पुस्तकाइतकाच एक उत्कृष्ट लेख लिहिला आहे. टाइममध्ये जे काही लेखक पुस्तकाविषयी फारच उपयुक्त लेख लिहीत असतात, त्याच्यापैकीच श्री. पॉल ग्रे आणि श्री. टीमोथी फूट हे दोघे होत. इंग्रजीमधल्या वाक्प्रचाराना 'टाइम' असे काही टिकस्ट्स आणि टर्नस् देतो की ते आपल्या कायमच्या लक्षात राहातात. इथे एकच उदाहरण देतो. Vox populli म्हणजे Voice of the people किंवा popular opinion. यावरून टाइमने T. V. वर टीका करताना Box populli म्हटले आहे. या इडियट बॉक्सला आता दुसरे नाव मिळाले व आपल्याही Vox populli चा अर्थ नेहमीसाठी लक्षात राहील. ही असली कात्रणे जास्त वाचली जावीत म्हणून आम्ही ती प्रत्येक पुस्तकाच्या पहिल्या पानावर 'spotlight on special news' म्हणून लावतो. नाही तर टाइम साप्ताहिकाची तीन वर्षांची वर्गणी रु. १००० च्या पुढे! मग हे सर्व महागडे मटेरियल रद्दीत टाकण्याऐवजी (जुन्या टाइमला बाजारात कवडीचीही किंमत नाही.) पुस्तकात लावले म्हणजे हजारो वाचकाना त्याचा फायदा होतो. We at the Phoenix are recycling the waste'

श्री. पॉल ग्रे या लेखात लिहितात की, 'If Wordsworth had gone to medical school, he might have produced something very like the essays of Lewis Thomas.' है कोई आवाज? अशी किती तरी सुंदर वाक्ये श्री. श्री. पॉल ग्रे यांनी या लेखात लिहिली आहेत.

या पुस्तकात असे २९ काव्यात्मक पण वैज्ञानिक निबंध आहेत. आणि प्रत्येक निबंध सुमारे १२०० शब्दाचा आहे.

एका संपादकाने एकदा डॉ. थॉमस याना काही विषयावर बोलताना ऐकले व अवघड विषय ते किती सोप्या व सरळ भाषेत सांगतात त्याचे या संपादकाला कौतुक वाटले. त्यांनी मग डॉ. थॉमसना आपल्या नियत कालिकासाठी स्तंभ लिहिण्यास सांगितले आणि अशा तऱ्हेने त्याच्या 'The Lives of a Cell – Notes of biology watcher' आणि 'The Medusa and the snail' या पुस्तकांचा जन्म झाला. त्याच्या 'Lives of a Cell' या पुस्तकाला १९७५चे नॅशनल बुक अॅवॉर्ड मिळालेले आहे. जगभर या पुस्तकाच्या ३००,००० प्रती खपल्या आहेत आणि ११ भाषामध्ये त्याचे भाषांतर झाले आहे

धवधवीत यश येतं ते पुष्कळ वेळा बाहेरचे दार ठोठावून न येता हळूच चोरपावलानी मागच्या दारातून येत आणि जेव्हा यश अपेक्षित असतं तेव्हा ते येतच नाही. डॉ. थॉमच्या बाबतीतही असेच झाले. त्यानी जेव्हा मासिकात लेख लिहायला सुरुवात केली तेव्हा ते लेख पुस्तकरूपाने प्रसिद्ध होतील असे त्याना वाटले नव्हते. 'Lives of a Cell या पुस्तकाला विज्ञानक्षेत्रात अॅवॉर्ड मिळाले नव्हते तर art and letters या क्षेत्रात मिळाले होते.

डॉ. थॉमस त्याच्या पुस्तकाच्या पहिल्या लेखात मेड्युसा आणि गोगलगायीचे वर्णन करतात. मेड्युसा म्हणजे जेलीफिश. पौराणिककाळात, ग्रीक दंतकथेत मेड्युसा नावाची एक राक्षसी होती. तिला केसाच्या जागी असंख्य, वळवळणारे साप होते जेलीफिशला सुद्धा असेच सापासारखे वळवळणारे, केसाळ अवयव असतात म्हणून त्याला मेड्युसा म्हणतात. जेलीफिश हे घटाकार, श्लेष्ममय, चिकट, मऊ व कधीकधी छत्राकृती असे प्राणी होत. ज्याला सामान्य भाषेत मासे म्हणतात ते हे नव्हेत, त्यापैकी काही समुद्रकाठच्या वाळूवर मरून पडतात. त्याला कोणी समुद्रफेस किंवा समुद्रफेण असे म्हणतात.

डॉ. थॉमस त्याच्या लेखात म्हणतात की सर्वसाधारणपणे निसर्गामधल्या जीवाचा वाढता कल सहजीवन, एकता व मिलाफ या गोष्टीकडे असतो. गोगलगाय आणि जेलीफिश या दोन जलचर प्राण्याचे उदाहरण देऊन ते सांगतात की, गोगलगाय कायम जेलीफिशच्या शरीराचा एक लहान अवयव तोंडात ठेवून जगते; पण या अवस्थेत असताना सुद्धा या दोन्ही प्राण्याचे निसर्गनियमाप्रमाणे प्रजोत्पादन सुरू असते. या दोन्ही

प्राण्याना पिल्ले होतात; पण जेलीफिशची पिल्ले गोगलगायीच्या लहान पिल्लाना पकडतात आणि खातात. यामुळे जेलीफिशच्या पिल्लाची वाढ होते आणि ते पाण्यात दुसरीकडे निघून जातात.

आता एखाद्याला असे वाटेल की, जेलीफिश याप्रमाणे गोगलगायीच्या जीवनचक्राला छिन्नविछिन्न करतो; पण ही गोष्ट घडत नाही त्याच वेळी गोगलगायही आपल्या तोंडात असलेला जेलीफिशचा अवयव कुरतडू लागते आणि या खाद्यामुळे तिची हळूहळू वाढ होऊ लागते शेवटी एक वेळ अशी येते की, तेव्हा गोगलगायीची वाढ पूर्ण होते आणि जेलीफिशच्या शरीराचा भाग जाऊन तो परत एक अतिशय लहान असा परोपजीवी प्राणी बनतो. याप्रमाणे हे चक्र परत सुरू होते आणि आपल्याला समजत नाही की खाणारा कोण आणि खाद्य कुठले.

या पाण्याखालच्या वैचित्र्यपूर्ण नाट्यावरून डॉ. थॉमसना या पुस्तकाचे शीर्षक सुचले असावे. या नाट्याचा प्रतिध्वनी त्याच्या बाकीच्या लेखातही उमटलेला आपल्याला दिसतो.

चार्लस डार्विनोत्तरकाळात आयुष्य म्हणजे फक्त एक जीवघेणी धडपड आहे (Survival of the fittest) असा दृष्टिकोन रूढ झाला होता. टेनिसन या कवीची Nature is red in tooth and clam ही एक ओळसुद्धा प्रख्यात आहे; पण डॉ. थॉमसच्या मते जीवनात इतकी harmony, symbiosis of union आहे की शेवटी मानवजात त्याच्या cussedness वर मात करील असे डॉ थॉमसना वाटते.

या जगात स्पर्म व अेग याच्या मिलाफामधून जी सेल म्हणजे पेशी तयार होते आणि त्याची परिणती शेवटी मेंदूत होते या प्रक्रियेला तोड नाही. टेस्ट टयूब बेबी, टेस्ट टयूब बेबी काय घेऊन बसला आहात असे डॉ. थॉमस विचारतात. टेस्ट टयूब बेबीसारख्या काही प्रचलित विषयांवर उगीचच बोभाटा होत आहे असं डॉ. थॉमस यांचे मत आहे.

तुम्ही जोहान सेबास्टियन बाक ऐकला आहे का ? या प्रख्यात संगीतकाराची सेंट मॅथ्युज् पॅशन नावाची एक कलाकृती आहे. या कलाकृतीच्या टेपचा आवाज वाढवला की, तो माणसाच्या सेंट्रल नव्र्हस सिस्टिमसारखा असतो असे डॉ थॉमसन म्हणतात

डॉक्टरलोकांची नजर बारकावे टिपण्यात पटाईत असते असे श्री. पॉल ग्रे म्हणतात. त्यामुळे ते उत्तम लेखक होऊ शकतात असेही श्री. ग्रे याना वाटते. ( मेडिकोजनी आणखी ताठर बनू नये ! ) त्यानी काही उदाहरणेही दिली आहेत. आर्थर कॉनन डॉइल, सॉमरसेट मॉम, अॅन्टन चेकॉव्ह, विल्यम कार्लोस विल्यमस, वॉकर पर्सी वगैरे.

राभाप्पांनी सौदर्यशास्त्राविषयी बरेच काही लिहिले आहे. श्री. प्रभाकर पाध्ये यानी सुद्धा या विषयावर लिहिले आहे; पण डॉ. थॉमसनी दोन वाक्यांत सौदर्यानुभवावर काय लिहिले आहे ? " It's just plain fun learning something that you didn't know. There is a real aesthetic experience in being dumbfounded. "

–जे. एन्. पोंडा ८०%

–अनिता मराठे २०%

---

**वाचनालयात नवीन दाखल झालेली पुस्तके**

1. Bombay : By Dom Morass Rs. 133/—
2. Ghost Story : ( A Horror Novel ) By Straub Peter
3. Serpentine : (True crime story of Charles Shobraj) By Thompson Thomas
4. The stand : ( Best sellers Horror Novel ) By Stephen King

**मराठी**

1. राजर्षी शाहू छत्रपती : (चरित्र) धनजय कीर
2. समाजशास्त्र : गाडगीळ न. वी.
3. हॅलो ऽ ऽ ट्रंक बुकिंग : (विविध अनुभव) कविता नरवणे
4. विनोदचिंतामणी : (स्वत विषयीचे लेख) चि. वि. जोशी
5. सौंदर्यानुभव : (सौंदर्यशास्त्र) प्रभाकर पाध्ये

Our books have priceless clippings inside them.
Treat them tenderly, differently !

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.**

---

## इंदिरा काँग्रेस : पृष्ठ ६ वरून

हकालपट्टी करण्यासाठी युवकगटाचा त्या उपयोग करून घेतील.

पण इंदिरा कॉंग्रेसमधील युवायुवती सत्तेच्या राजकारणातच स्वतःला गुरफटून घेणार की समान परिवर्तनाचा आर्थिक-सामाजिक कार्यक्रम निष्ठेने अमलात आणण्याकडे आपली शक्ती खर्च करणार ? कार्यक्रमाला निष्ठेने वाहून घेण्यापेक्षा इंदिरानिष्ठेचे व संजयनिष्ठेचे प्रदर्शन करण्यावरच या युवकाचा भर असल्याचे आतापर्यंत दिसून आले आहे आज गरज आहे ती व्यक्तिनिष्ठेपेक्षा कार्यनिष्ठेची. सरकारने भरीव कार्यक्रम हाती घ्यावा आणि युवकानी त्याची निष्ठेने अंमलबजावणी करावी असे चित्र दिसणार आहे का ? आज त्याची आवश्यकता आहे; पण सरकार आणि युवक काँग्रेस या दोन्ही आघाड्यावर या दृष्टीने तयारी दिसत नाही, मतदारांनी इंदिरा गांधीच्या हाती देशाची सत्ता सोपवून त्याना आणखी एक संधी दिली आहे. केवळ निवडणुका जिंकण्याच्या व सत्ता टिकविण्याच्या राजकारणापलीकडे जाऊन समाजपरिवर्तनाचा भरीव कार्यक्रम सरकारने आणि सत्तारूढ पक्षातील युवकसंघटनेने निष्ठेने आणि निर्धाराने अंमलात आणला नाही तर असंतोष वाढू लागेल; पण आतापर्यंतच्या अनुभवावरून निराळे फारसे काही घडेल असे वाटत नाही □

## कुठल्या अर्थशास्त्राच्या मागे आपण धावणार आहोत

पृष्ठ २ वरून

व्यवस्थापन करावे. कारखान्याना कच्चा माल पुरविणे हा जंगलाचा मुख्य उपयोग नाही. अर्थात उद्योगासाठी लागणारे पाणी जंगलेच पुरवितात. हे लक्षात घ्यावे. हिमालयातील ग्लेशियर्स वितळतात म्हणून गंगा वाहते आहे; परंतु गेल्या वीस वर्षात जंगले तुटल्यामुळे हे ग्लेशियर्स मागे हटत चालले आहेत, हिमालयात पाण्याचा दुष्काळ ही विपरीत गोष्ट आता अनुभवासच येऊ लागली आहे. केवळ माती, पाणीच नव्हे तर झाडापासून मिळणारी शुद्ध हवा हाही जंगलांचा महत्त्वाचा उपयोग आहे. आज हवेच्या प्रदूषणाचा जो जागतिक धोका निर्माण झाला आहे, या संदर्भात त्या गोष्टीला अधिक महत्त्व आहे.

(२) मूळ जंगले तोडून त्या ठिकाणी व्यापारी हेतूने एका प्रकारची झाडे लावण्यात येतात. ते याबवून मूळ होती तशी मिश्र स्वरूपाची नैसर्गिक जंगले पुन्हा निर्माण करावीत.

(३) कायम स्वरूपाची आणि स्वावलबी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी जंगलाचे पुनरुज्जीवन करताना फूड, फॉडर, फ्युएल, फर्टिलायझर आणि फायबर (वृक्षकपात) या गोष्टी जंगलापासून मिळाव्यात या दृष्टीने नियोजन करावे. गहू—तादुळाच्या शेतीपेक्षा जंगलांची अन्नोत्पादनक्षमता वीसपट आहे हे लक्षात घ्यावे. म्हणून 'वृक्ष–शेती'च जगापुढील संभाव्य अन्नतुटवडयाच्या महाभयानक धोक्यास उत्तर ठरू शकेल जंगलांमुळे जमिनीची धूप थांबूनही अन्नोत्पादन वाढेल.

शेवटी सुदरलालजी म्हणाले, मनुष्य आणि प्रकृतीच्या प्रेममूलक सबंधाची पुनर्स्थापना करणे हे 'चिपको' आंदोलनाचे अंतिम उद्दिष्ट आहे धरतीचे आणि माणसाचे नाते हे माता–पुत्राचे नाते आहे. बिहारच्या दुष्काळात एक माता मृत होऊन पडली होती, पण तिचे मूल स्तनपान करीत होते असे एक दृश्य पाहायला मिळाले. तसेच धरतीही अंतिम क्षणापर्यंत माणसाच्या पोषणाचे कार्य चालूच ठेवणार आहे; पण आज ही धरतीमाता बीमार झाली आहे हे लक्षात घ्या. तिचा अंत पाहू नका. या धरतीवर येणाऱ्या पिढयांचाही अधिकार आहे. त्यांच्यासाठी ही धरती अधिक सुंदर करून ठेवा.

राजकारणाने माणसाच्या समस्या सोडविता येतील असे आपल्याला वाटत होते; पण तो भ्रम ठरला आहे. मानव–निसर्गाच्या प्रेममय संबधांची पुनर्स्थापना केल्यानेच माणसाचे प्रश्न सुटतील. आज व्यवस्थापक निर्माण केले जात आहेत; परंतु या व्यवस्थापक मध्यस्थामुळेच लोकतंत्र धोक्यात आले आहे माणूस परावलंबी झाला आहे या व्यवस्थेचाच तो गुलाम झाला आहे. त्याऐवजी धरतीचा आणि मनुष्याचा सरळ संबंध प्रस्थापित करा, कामगारांच्या आदोलनाची प्रतिकारशक्ती कमी होत जाते हा जगभरचा अनुभव आहे, तर (जिथे धरती व मनुष्य याचा सरळ, मध्यस्थविरहित संबंध आहे अशा) किसानाची प्रतिकारशक्ती कमी होत नाही हा अनुभव आपण 'चिपको' आदोलनातून घेतला, असे शेवटी सागून सुदरलालजीनी पुणेकराना या आदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. या आदोलनाविषयी आदोलनाच्या उद्दिष्टाना पूरक अशा सर्व भाषांतील साहित्याचे हिंदी व इंग्रजीत भाषातर करून त्याचा प्रसार करण्याची जबाबदारी पुणेकरांनी घ्यावी अशी विनती करून सुंदरलालजीनी भाषणाचा समारोप केला.

प्रा. रा. के. मुटाटकर यांनी सुंदरलालजीचे आभार मानताना सागितले, येत्या सप्टेंबरमध्ये या आदोलनाचा जवळून अभ्यास करण्यासाठी पुण्यातील पन्नास युवकांना पाठविण्यात येईल. शेवटी हिमालयातील जंगलाच्या विनाशाचे दुष्परिणाम दाखविणाऱ्या काही रंगीत स्लाइडस् दाखविण्यात आल्या व कार्यक्रम संपला. आपला सदेश प्रभावीपणे श्रोत्यांपर्यंत पोचविण्यामध्ये सुदरलालजी यशस्वी झाले होते हे वेगळे सांगण्याची आवश्यकताच नाही.

—अनिल काळे

---

रंगभूमी

# 'अश्वमेध'

### वैयक्तिक शोकांतिका !

मूळचा तो इंग्रजीचा प्राध्यापक. पण शेक्सपिअरवर कितीही प्रेम केलं किंवा वर्गात कितीही जीव तोडून तो शिकवला तरी त्यावर पोट भरता येत नाही अशी जाणीव त्याला व्हायला लागली आणि प्राध्यापकाची नोकरी सोडून तो मुंबईला आला. एका बडया परदेशी फर्ममध्ये आता तो एक्झिक्युटिव्ह बनला होता. छानशा अपार्टमेंटमध्ये प्रेमविवाह केलेल्या पत्नीबरोबर तो राहात होता. पण तिला सुख पुरत नव्हतं. आहे यावरच समाधान न मानता फर्मचं डायरेक्टर बनलं पाहिजे हे स्वप्न त्याच्यापेक्षा तिलाच जास्त वेळा पडत असे आणि त्यामुळे त्याच्या मनातला अंगार फुलवायचं काम ती करत असे.

कदाचित तो डायरेक्टर झालाही असता. त्याचं काम चांगल होत. त्याच्याबद्दल वरिष्ठाचं मतही चागलं होतं. शिवाय एक ॲडिशनल डायरेक्टरची जागाही फर्ममध्ये निर्माण करण्यात आली होती. अचानक काही अडचण आली आणि फर्मचा परदेशी जाणारा माल निकृष्ट दर्जामुळे पाठवण्याचं स्थगित करावं लागलं. यामुळे दीड कोटी रुपयांचं नुकसान तर होणार होतंच, शिवाय आतरराष्ट्रीय बाजारपेठेत फर्मची नाचक्कीही होणार होती. केवळ बारा दिवसात काही

तरी तोडगा काढणं आवश्यक होतं. त्याच्या बुद्धिमत्तेला व कर्तृत्वाला हे आव्हानच होतं. त्याच्या बढतीमध्ये निर्माण झालेला अडथळा पाहून काही सहकाऱ्याना उकळ्याही फुटत होत्या. शेवटी त्याने उपाय शोधून काढला. फर्ममध्ये संप सुरू झाला. दगडफेक, हाणामारी, बॉंबस्फोटही ! बारा दिवसानी संप मिटला, या अनन्यसाधारण कारणामुळे नुकसानभरपाई देण्याच्या संकटातून फर्म बचावली, तो ॲडिशनल डायरेक्टर बनला, एका सच्च्या कामगार–कार्यकर्त्याचा बळीही गेला !

'नाट्यसुमन' तर्फे रंगभूमीवर आलेल्या 'अश्वमेध' या नव्या नाटकाचं कथानक हे असं आहे श्री. शंकर यांच्या 'सीमाबद्ध' या बंगाली कादंबरीचं श्री. अशोक शहाणे यानी मराठीत रूपातर केलं व त्यावरच श्री. रत्नाकर मतकरी यांनी नाटक बेतलं आहे

महत्त्वाकांक्षेपोटी मनुष्य कोणत्या थराला जाऊन पोचू शकतो हे दाखवणं हा या नाटकाचा प्रधान हेतु शेक्सपिअरच्या 'मॅक्बेथ' नाटकातील उतारे व प्रसंग पात्राच्या तोडी घालून श्री. मतकरीनी ते चागल्या तऱ्हेनं दाखलं आहे. पण बळी गेलेल्या कामगार–कार्यकर्त्याचं भूत त्याला दिसतं हा नाटकातील शेवटचा प्रसंग आधी बांधत व साधत आणलेला बराचसा परिणाम धुऊन टाकतं. कारण १) ते भूत न वाटता भुताचं कार्टून वाटतं. आणि २) अंतर्गत द्वंद्वाच्या पातळीवर पोचलेलं त्याचं आणि प्रेक्षकाचंही – मन या प्रसंगामुळे खाडकन भूत–पिशाच्च या चमत्कृतिजन्य विषयावर येऊन आदळतं. (घरी गेल्यारर चार– सहाजणांनी त्या विषयातले अनुभव सांगितले असतील तर त्याचं श्रेय नाट्यदिग्दर्शकाला दिलं पाहिजे,) ३) या प्रसंगानंतर पडदाच पडतो.

नाटकातल्या एका उपकथानकाचा मात्र या ठिकाणी उल्लेख केलाच पाहिजे. त्याची ही सारी वाटचाल पाहणारी त्याची मेव्हणी त्याच्याच फर्ममधील उमद्या आकर्षक व्यक्तिमत्वाच्या तरुणाशी लग्न करण्यास नकार देते. कारण तिला केवळ भौतिक सुखाच्या मागे लागणारा व त्यातच सर्वस्व मानणारा नवरा नको असतो. तसंच अशा नवऱ्याची बायको होऊन त्याचा अहंकार फुलवत ठेवण्याचीही तिची तयारी नसते, कामगार-कार्यकर्त्याबरोबरची तिची सलगी मात्र अमळ जास्तच वाटते.

श्रीकात मोघे व भावना नाटकातील प्रमुख भूमिकामध्ये आहेत दोघानीही आपापल्या भूमिका व्यवस्थित पार पाडल्या आहेत; पण तिच्या बहिणीचं काम करणारी तरुणी मात्र (सुदैवानं नाव विसरलो) हिंदी चित्रपटात चीड येईपर्यंत आगाऊपणा करणाऱ्या बालनटाप्रमाणे स्टेजवर वावरते.

शेवटी थोडंसं नाटकाच्या निवडीविषयी. कोणत्याही बीजाचं कलेच्या एका आकृतिबंधातून दुसऱ्या आकृतिबंधामध्ये रूपांतर होत असताना त्यातील कसदारपणा कमी होण्याची–नष्ट होण्याचीही भिती असते. (पहा–' चानी', 'जैत रे जैत ' यासारखे अनेक) 'पिग्मॅलिअन' सारखं एखादंच बीज निर्माण होतं की जे 'माय फेअर लेडी' पासून 'ती फुलराणी' पर्यंत सर्व माध्यमांमधून सारखाच आनंद देतं. अर्थात याचं बरचसं श्रेय हे रूपातर करणाऱ्यालाच असतं. 'अश्वमेध' पाहताना जाणवलेली सर्वात प्रमुख बाब म्हणजे मूळ कादंबरीतला काळ आणि घटनाचा स्पॅन रंगमंचाच्या चौकटीत बसवण्यात सर्व संबंधिताना अपयश आले आहे. त्यामुळे मूळ कादंबरीत अभिप्रेत असलेली आणि जाणवणारी वैश्विकता (Universality) 'अश्वमेध'मध्ये नष्ट होते व ती शंका महत्त्वाकांक्षी माणसाची वैयक्तिक शोकांतिका (Private tragedy) बनते.

तरीही सध्याच्या साकळलेल्या काळात १९७८, १९७९ व आता १९८० सालीही सातत्याने मराठी रंगभूमीला किमान दर्जेदार नाटके पुरविणारे श्री. रत्नाकर मतकरी ('लोककथा' ७८,' 'अजून यौवनात मी' व 'अश्वमेध') आणि त्यांची ही नाटके सादर करणारा सच अभिनंदनास पात्र आहे.

—सतीश कामत


मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... —प्रा. वा. ल. कुलकर्णी (प्रास्ताविकातून)

**सांगत्ये ऐका**

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले
हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र
तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये
**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# चित्रपट

सदानंद बोरसे

## अलीबाबा और चालीस चोर

### बच्चे लोग, एक हाथ से ताली बजाओ

गोष्ट संपल्यावर बादशहा शहरियार जांभई लपवत म्हणाला, 'वा, वा, फारच मार्व्हलस गोष्ट होती.' तेव्हा दुनियाझाद म्हणाली, 'खाविंद, ही गोष्ट तर काहीच नाही. याच्यापेक्षा इंटरेस्टिंग गोष्टींचा ताईकडे खजिना आहे ताई, अजून रात्र पुष्कळ बाकी आहे. सांग ना, अजून एखादी गोष्ट !'

'खाविंदांची परवानगी असेल, तर सांगेन!' शहराझाद म्हणाली.

'सांग, सांग!' म्हणत बादशहा पुटपुटला, 'आलीया भोगासी.'

'ठीक आहे.' असे म्हणून शहराझादने गोष्टीला सुरुवात केली.

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. हिंदुस्थानात त्या वेळी चित्रपट नावाचा धंदा फार जोरात होता. तुम्ही विचाराल की, चित्रपट म्हणजे काय? तर माणसे हलत-बोलत असताना त्यांची पटापट छायाचित्रे काढून ठेवून, नंतर ती तशाच क्रमाने पटापट डोळ्यांपुढे हलवून त्या हलण्याबोलण्याचा इफेक्ट निर्माण करायचा. तो बघायला बरीच माणसे एका बंद, काळोख्या जागेत–तिला थिएटर म्हणत–गर्दी करीत. तर एफ्. सी. मेहरा नावाच्या एका व्यापाऱ्याची ईगल फिल्म्स नावाची पेढी हा चित्रपटाचा धंदा करीत असे. मी तुम्हाला बरेच दिवसांपूर्वी अलीबाबा आणि चाळीस चोरांची गोष्ट सांगितली होती, आठवतंय का ?

'हो. हो, आठवतंय ना'

तर त्या गोष्टीत बरेच बदल करून त्याच्यावर चित्रपट काढायचं मेहरांनी ठरवलं. एक म्हणजे ती गोष्ट बहरिस्तान नावाचा देश आणि त्यातील गुलाबाद नावाचं शहर या ठिकाणी घडते, असं दाखवायचं त्यांनी ठरवलं त्यासाठी त्यांनी त्या वेळच्या उझ्बेकिस्तान या रशियातील प्रदेशाची निवड केली. उझ्बेक लोकांच्या आतिथ्यशील व मदतीस तत्पर स्वभावामुळं त्यांनी मेहरांना चित्रपटात बरीच मदत केली. त्यामुळं मेहरांना ईगल फिल्म अँड उझ्बेक फिल्म्स असं कंबाइंड बॅनर मिळालं. सिनेमात धर्मेंद्र, हेमामालिनी, झीनत अमान वगैरे मंडळींना इंडो-सोव्हिएट प्रॉडक्शनमध्ये काम केल्याचा भाव मारता आला आणि मुख्य म्हणजे उझ्बेक लोकांच्या अश्वारोहणातील कौशल्यामुळं चित्रपटात तसले बरेच प्रेक्षणीय शॉट घालता आले. माझ्या आधीच्या गोष्टीतील अलीबाबा फारच सीधासाधा होता. काय वाट्टेल ते करून पण फार वहिवाट सोडून न वागता श्रीमंत व्हायचं एवढंच त्यानं ठरवलं होतं; पण या चित्रपटातील अलीबाबा शूर, धाडसी, तरुण (म्हातारा इतुका न अवघे चाळिशीचे वयमान), देशभक्त, 'परित्राणाय साधूनां, विनाशाय च दुष्कृताम्' वगैरे वगैरे असा हिंदी चित्रपटांचा हिरो आहे. माझ्या गोष्टीत मर्जिना ही अलीबाबाची दासी होती, तर चित्रपटात ती एकदम शहजादीच आहे. (मर्जिना झालेली हेमामालिनी दिसते मात्र फारच सुरेख हं.) शिवाय मग रहस्य, गुहेतील 'सिम सिम' परी वगैरे चित्रपटाच्या करमणूकप्रधान अंगाला पोसणारे बरेच बदल आहेत. एनी वे, तत्कालीन प्रेक्षकांची रुची लक्षात घेऊन असे बदल करणे आणि नाचगाणी, हाणामाऱ्या वगैरे गोष्टी घालूनच चित्रपट तयार करणे अत्यावश्यक आहे, असे त्या वेळी निर्माता-जमातीचे मत होते. त्याप्रमाणे मेहरांनीही हा चित्रपट काढला. पोषाख, स्थळे, निरनिराळ्या वस्तू या साऱ्यांमधून उभे केलेले सुंदर काल्पनिक वातावरण, चाळीस चोरांच्या अफलातून गुहेपासून (या गुहेतील चीजवस्तू फक्त पाहत राह्यच्या, प्रश्न विचारायचे नाहीत– उदाहरणार्थ–गुहा उघडताना गुरुत्वाकर्षण नियमाला धाब्यावर बसवून वरच्या दिशेने जात बंद होणारा जलप्रपात, गुहेमध्ये उडणारे भुईनळे) दारूचा गुत्ता, कासीमचे घर; गुलामांच्या लिलावाची जागा इत्यादी सर्व जागांसाठीचे देखणे नेपथ्य या गोष्टी चित्रपटात फारच प्रेक्षणीय बनविल्या आहेत. 'बच्चे लोग, एक हाथ से ताली बजाओ।' अशी मधून मधून दिग्दर्शकसाहेब हाळी देत आणि काही जादुई चमत्कार दाखवून टाकत.

चित्रपट तयार होत होता; तेव्हा अेफ्. सी. मेहरा आणि कंपनीला हेमामालिनी आणि झीनत अमान यांच्यातील शीतयुद्धाचा बराच त्रास झाला. दुसरीचा रोल मोठा आणि जास्त भाव खाऊन जाणारा असल्याची प्रत्येकीची तक्रार होती दोघींच्या भूमिकांची अदलाबदल केली असती ना तरी दोघींनी हीच तक्रार केली असती. अखेर कामाचा विचार केला तर झीनत थोडीशी सरस ठरली; तर ते शीतयुद्ध एवढ्यावरच. थांबलं नाही. सिनेमा रिलीज होण्याच्या दोन तीन दिवस अगोदर पैशाचं खुसपट काढून हेमानं कोर्टामार्फत सिनेमा रिलीज होऊ न देण्याचा एक व्यर्थ प्रयत्न केला. एनी वे, हा चित्रपट म्हणजे जणू धर्मेंद्र–हेमाच्या विवाहाबद्दल त्यांना मिळालेलं प्रेझेंटच होतं !

' खुर्रर्र–फस्स्स् ऽऽ–घुर्रर् ऽऽ. '

शहरियार व दुनियाझाद दोघेही झोपलेले पाहून शहराझादही लवंडली आणि पडल्या पडल्या उद्या कोणत्या सिनेमाची गोष्ट सांगायची याचा विचार करू लागली.

## चित्रपटाबाहेर

' सखबाई, साळूबाई, गुपचूप चला। लग्नाला चला हो लग्नाला चला।' असे म्हणत म्हणत धर्मेंद्र हेमामालिनीचे लगीन तर लागले. त्या लग्नाची मंगलाष्टके विरतात न विरतात, तोच आणखी दोन लग्नांतील वधू वर बाशिंगे बांधून सजायला लागले आहेत.

सात वर्षांपूर्वी–

चित्रपटसृष्टीच्या तारांगणात अचानक एक चटक-चादणी अवतरली आणि अक्षरश: एकाच चित्रपटात काम करून, अनेक दिलों की धडकन वगैरे खिशात टाकून त्या वेळच्या सुपरस्टारबरोबर संसार थाटून अदृश्य झाली. डिंपल कापडिया आणि राजेश खन्ना यांच्या विवाहामुळे एका उगवत्या अभिनेत्रीच्या चित्रपटसंन्यासाने बऱ्याच जणांना चटका लागला होता.

सात वर्षे उलटताना 'बॉबी' लक्षात असली तरी डिंपलचे हळूहळू विस्मरण व्हायला लागले होते. मधूनमधून राजेशचे आणि तिचे फारसे पटत नसल्याच्या वा त्यांच्या बारीकसारीक कुरबुरीच्या बातम्या यायच्या; पण बहुतेक वेळा पेल्यातील वादळ वा प्रसिद्धीचा स्टंट म्हणून त्या बातम्या दुर्लक्षित व्हायच्या; पण गेल्या आठवड्यात मात्र या सगळ्याचा मोठा स्फोट झाला आणि डिंपलने घटस्फोटासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला. अर्जात राजेश नशेमध्ये आपल्याला वारंवार मारहाण करतो, असे डिंपलने म्हटले आहे. (बिचारी ! पावसाने झोडले आणि नवऱ्याने मारले तर जावे कुठे ? कोर्टात )

लग्नाच्या वेळीच आपल्या सुपरस्टारच्या पदावरून राजेश खन्ना घसरायला लागला होता. त्याच्या नंतरच्या अनेक पडेल चित्रपटांनी आणि 'पंत मेले, राव चढले' न्यायाने आलेल्या अमिताभच्या प्रचंड क्रेझने ही घसरण अधिकाधिक निसरडी बनवली. राजेशच्या डिंपलबरोबरच्या बेताल वागण्यात या अपयशाचा वाटा कितपत असेल ? या वेळी एक आठवण होते–' जंजीर ' अजून प्रकाशित झाला नव्हता, अमिताभ सुपर-स्टार सोडाच स्टार म्हणूनही मानला जात नव्हता–कदाचित पडेल स्टारच मानला जात होता; पण त्याही वेळी जयाने त्याला धीर दिला, त्याची हिंमत बांधती ठेवली. या उदाहरणाच्या पार्श्वभूमीवर राजेश डिंपलचा घटस्फोट फारच विसंगत वाटतो. की डिंपलने खूप सहन करण्याचा प्रयत्न केला आणि आता असह्य झाले तेव्हाच घटस्फोटासाठी अर्ज केला ? कोण जाणे ! आता दोघे कदाचित पुन्हा एकत्र येतील, गैरसमजाचे धुके दूर करतील ( आणि तसेच होवो, ही सदिच्छा) किंवा एकमेकावर आरोप-प्रत्यारोपाची धुळवड करतील, आपापले करिअर सांभाळण्याचा प्रयत्न करतील आणि लौकरच नवीन जीवनसाथीही निवडतील कदाचित !

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. घ. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये.  राजहंस प्रकाशन, पुणे ३०.